म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : नाटक
सं.क्र. : १९७०१

# वर्षाव

IRBK-0119701

10 DEC 2003

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 19 JUL 1983<br>10 JUL 1983<br>9 JUL 1983<br>30 JUL 1983 | 1 OCT 1983<br>16 OCT 1983 |
| 0 AUG 19..<br>1 AUG 1983<br>9 SEP<br>14 SEP 1983<br>16 SEP 1983<br>14 AU... | 2 OCT 1983<br>1983<br>JUN 1984<br>28 AUG 1984<br>29 DEC |

(क्र. ५०००)
५०००-१२-८२

वाचनालय
नाटक
१६७०१
२८/४/८३

# वर्षाव

शं. ना. नवरे

तीन अंकी स्वतंत्र नाटक

IRBK-0119701
IRBK-0119701

मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई ४

माझे ज्येष्ठ स्नेही कै. पु. भा. भावे यांच्या 'वर्षाव' या कादंबरीचे हे नाट्यरूपांतर.

रूपांतर करताना नाट्याच्या दृष्टीने कादंबरीतील काही प्रसंगांत बदल करणे मला आवश्यक वाटले. मात्र ते करताना कादंबरीवर अन्याय होणार नाही असा प्रामाणिक प्रयत्न मी केला आहे.

नाट्यलेखन करताना निर्माते श्री. अनंत काणे आणि दिग्दर्शक श्री. नंदकुमार रावते यांनी केलेल्या सूचना मला फार उपयोगी पडल्या. या दोघांचा, तसेच या नाटकातील पडद्यापुढील व पडद्यामागील सर्व कलावंतांचा मी आभारी आहे.

कादंबरीचे नाट्यरूपांतर करण्यास परवानगी दिल्याबद्दल श्रीमती प्रभावतीबाई भावे यांचा आणि हे नाटक पुस्तकरूपाने प्रकाशित करणारे माझे स्नेही श्री. केशवराव कोठावळे यांचाही मी आभारी आहे.

'सौमित्र' — शं. ना. नवरे
डोंबिवली (पश्चिम)

© : सौ. अंजली नवरे

प्रकाशक :
केशव विष्णु कोठावळे
मॅजेस्टिक बुक स्टॉल
गिरगाव नाका, मुंबई ४

पहिली आवृत्ती :
जून १९८२

मूल्य : बारा रुपये

मुद्रक :
अ. के. कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०

मुखपृष्ठ : अरुण घाटे

नाट्य परीक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन, यांनी
प्रमाणपत्र क्रमांक डीआरएम्–१/१९८२, दि. २ जानेवारी १९८२
खाली या नाटकास मंजुरी दिली आहे.

मित्रवर्य डॉ० माधव नामजोशी
आणि सौ० कल्याणीवहिनी
यांना स्नेहपूर्वक

— शान्ता

या नाटकाचा प्रथम प्रयोग 'अभिजात, मुंबई' या संस्थेने शनिवार दिनांक १६ जानेवारी १९८२ रोजी रात्रौ ९ वाजता शिवाजी मंदिर, दादर, येथे सादर केला.

## भूमिका

काळ्या : गणा प्रधान
पेठे : भाऊ बिवलकर
आक्का : मालतीबाई पेंढारकर
दाबके : कमलाकर टाकळकर
मी : डॉ. काशिनाथ घाणेकर
कुसुम : आशा काळे
प्रभाकर : सतीश रणदिवे
तरुण : सुरेश सरदेसाई
टांगेवाला : गजानन निकम

* दिग्दर्शक : नंदकुमार रावते * निर्मिती : अनंत काणे
* नेपथ्य / प्रकाशयोजना : बाबा पार्सेकर
* पार्श्वसंगीत : अरविंद मयेकर
* रंगभूषा : जयंत बापट
* वेषभूषा : पॅपसन टेलर्स, पेडर रोड, मुंबई
* नेपथ्य साहाय्यक : दत्तू मेस्त्री, पेंटर जुन्नरकर
* प्रकाश नियंत्रण : पटेल लाइट सर्व्हिस
* ध्वनिमुद्रण : वेस्टर्न आउट डोअर ॲडव्हर्टाइझमेंट
* ध्वनिसंकलन : लक्ष्मण आंगणे
* निर्मिती प्रमुख : विजय पितळे
* निर्मिती व्यवस्था : दीपक सावंत
* रंगमंच व्यवस्था : गफूर आणि मंडळी, गजानन निकम, काशिनाथ समगिसकर, शेखर कालेकर, ओमप्रकाश फाटक, भगवान, अशोक
* प्रसिद्धी : एस्. व्ही. साल्ये आणि कंपनी, रॅडिकल पब्लिसिटी
* छायाचित्रे : राजदत्त

---

**महत्त्वाची जाणीव :**

या नाटकाचे पुनर्मुद्रण, प्रयोग, रूपांतर इत्यादी सर्व अधिकार सौ. अंजली नवरे, 'सौमित्र', डोंबिवली (प.), जि. ठाणे, यांच्याकडे आहेत. प्रयोग करण्यापूर्वी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास नैर्बंधिक इलाज केला जाईल.

# अंक पहिला

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. ९६५०९ नों. दि. २९/४/८३
वि. नाटक क्र.

## दृश्य पहिले

[ पडदा उघडताउघडता कादंबरीच्या नायकाचा आजचा आवाज ऐकू येऊ लागतो. ]

आवाज : उन्हाळा संपला, आकाशात मेघ फिरायला लागले, पावसाच्या पहिल्या सरी पडून मातीचा धुंद सुगंध वातावरणात दरवळायला लागला, की माझ्या जिवाला विलक्षण अस्वस्थता येते. मी उठतो आणि जवळच्या कुठल्याही स्टेशनवर जातो. उगीचच वाटतं, आता दीड तपानंतरसुद्धा माणसांच्या कुठल्या तरी लोंढ्यातून कुसुम मला येताना दिसेल.

....कुसुमला मी प्रथम पाहिलं ते पावसाळ्यातच. वकिलीच्या अभ्यासाचं शेवटचं वर्ष होतं. मी नागपूरला आमच्या मालकीच्या जुन्या वाड्यात पुन्हा वर्षभराच्या अभ्यासासाठी राहायला येत होतो. वाड्याच्या देखभालीचं काम या वेळी वडिलांनी माझ्यावर सोपवलं होतं....

[ आता पूर्ण प्रकाशात दिसतो वाड्याचा दर्शनी भाग.
दिंडी दरवाजा. पेठे, दाबके, तेलंगआक्का यांच्या खोल्या. नंतर 'मी' च्या खोलीवर जाणारा जिना. दिंडीपाशी वेडा काळ्या पाय पोटाशी मुडपून बसलेला. पेठे आपल्या खोलीतून अंगात काळा कोट चढवत येतात. ]

पेठे : आक्का, अहो आक्का —

[ आक्का बाहेर येतात. वयस्क, प्रेमळ. ]

आक्का : काय झालं ?

पेठे : किती वाजले, पाहिलंत ? अजून धाकट्या मालकांचा पत्ता नाहीय.

आक्का : येतील. उद्या कॉलेज सुरू होतंय त्यांचं. मोठ्या मालकांच्या पत्राप्रमाणं ते येणारच आज. पेठेसाहेब, गाडी वेळेवर यायला हवी, आल्यावर रिक्षा मिळायला हवी....

पेठे : नागपूर स्टेशनवर रिक्षा मिळत नाही असं कधी झालंय ? माझी कोर्टाची वेळ झालीय.

[ दाबके ऑफिसला जायच्या तयारीत बाहेर येतात. धिप्पाड, राकट चेहऱ्याचे. ते हळूच पेठ्यांच्या घरात डोकावून पाहातात. काळ्या चमत्कारिक आवाज करतो. दाबके दचकतात. ]

माकडांची धाड येऊन आमच्या खोलीवरची कौलं पार फुटली आहेत, माहीत आहे ना ? धाकट्या मालकांकडून नवी कौलं टाकून घ्यायला हवीत.

आक्का : मोठ्या मालकांना तुम्ही कळवलं आहे ना ?

पेठे : ऑफ कोर्स. दोन दिवस आकाशात ढग गडगडताहेत. आता पावसाची तेवढ्यात धाड आली म्हणजे बघायला नको.

दाबके : ( मध्येच ) आक्का, यंदा पाऊस काही लौकर यायची चिन्हं नाहीत. पेपरात चक्क म्हटलंय —

पेठे : आक्का, आमच्या विद्वान मित्रांना — दाबकेमहाशयांना म्हणावं, आपलं दोघांचं आर्ग्युमेंट चाललंय, त्यात भाग न घ्याल तर बरं. तुम्हाला माहीत आहे आक्का, शक्यतोवर त्यांच्याशी मी बोलत नाही.

दाबके : खरं तर मीच बोलत नाही त्यांच्याशी. आक्का, आमच्या ह्या अतिविज्ञान वकिलांना – पेठेमहाशयांनाही म्हणावं, आपलं दोघांचं बोलणं चाललंय....त्यात तोंड न घालाल तर बरं !.... तर पेपरात चक्क म्हटलंय, ढग गडगडले तरी ते पाऊस पाडतीलच असं नाही. काही ढग नुसते नावाचेच असतात.

पेठे : दाबके, तोंड सांभाळून बोला.

दाबके : आक्का, आपलं फक्त हवापाण्यावर बोलणं चाललं आहे. यांना का राग यावा ? तर आक्का, या वर्षी पाऊस —

पेठे : आक्का, धाकटे मालक आले की त्यांच्या कानावर याही गोष्टी घालणार आहे मी. शेजाऱ्यांच्या चाळ्यांच्या. मला काय कळत नाही की काय ?

आक्का : दाबके, तुम्ही तरी कशाला भांडणं काढताय ?

दाबके : मी पूर्वी कधी भांडण काढलं होतं ? ह्यांच्याआधी ते अवधानी राहायचे यांच्या जागेत. आमचं किती सख्य होतं माहीत आहे ना ? चारचौघींसारखी बायको. चांगली मोजून टणटणीत पाच मुलं. अवधानी-वहिनी मला तर दिराच्या जागी मानायच्या. ह्या लोकांचं सगळंच जगा-वेगळं. अरे आम्ही काय बायका पाहिल्या नाहीत की काय ?

पेठे : दाबके, धिस् ईज टू मच्. आय से, स्टॉप इट !

दावके : कोर्टात कामं नाहीत म्हणून इथं वाड्यात भांडणं काढताय? मी आक्कांशी बोलतोय. तुम्ही तुमच्या खोलीत जा....बाकी तिथं जाऊन तरी काय काम आहे म्हणा तुम्हाला! त्यापेक्षा कोर्टात जा. मिळाली तर दोन-चार कामं तरी मिळतील तिथं.

आक्का : दावके, हे फार होतंय. सकाळीसकाळी असं भांडत बसलाय. तुम्हाला आज हापीस नाहीय का?

दावके : आहे तर! पण मी जाईन नाही तर नाही जाणार....तर आपलं. अवधानींबद्दल चाललं होतं नाही का? माणूस फार सज्जन. पाच पोरांचा बाप, पण कसा? मजबूत!

पेठे : आक्का, असली अडाणी माणसं इथं असताना बोलण्यात काही अर्थ नाही. ( निघतात. ) धाकटे मालक आले की त्यांना आमचं छप्पर दाखवा माकडांनी घातलेला धुमाकूळ सांगा —

दावके : नागपुरातली माकडंसुद्धा रंगेल आहेत हो आक्का. आमचं किंवा अवधानींचं कधी छप्पर फोडलं नाही त्यांनी, आत डोकावून बघायला. ( हसतात. )

पेठे : माकडांचं माकडांना ठाऊक!

[ बाहेर रिक्षा थांबल्याचा आवाज. क्षणभरानं 'मी' येतो. काळोजी ओरडतो. ]

मी : काय काळोजी? बरे आहात? ( काळ्या हसतो. ) हातातलं सामान घ्यायचं तुम्हाला सुचलं असतं तर? बाकी मग तुमचा मुक्काम आमच्य वाड्यात कशाला असता, नाही का?

( काळ्याजवळ सामान देतो. काळ्या जिन्यानं जाऊ लागतो. ) आज कोको बिस्किटं नाहीत. ती उद्यापासून. ( हाक मारतो. ) काय आक्का —

आक्का : या. सुटले बाई मी तुमच्या भाडेकरूंच्या तडाख्यातून. सकाळपासून तक्रारीच चालल्या आहेत.

[ 'मी' दोघांकडं बघतो. ]

मी : काय दावके?

दावके : नाही, आमची काही तक्रार नाहीय.

[ पेठे पुढं होतात. 'मी'च्या खांद्यावर हात ठेवतात. ]

पेठे : नमस्कार. आपण मालकांचे थोरले चिरंजीव. प्रिन्स ऑफ वेल्स, होय ना? आपण मला ओळखलं नसेल?

आक्का : हे पेठे. नवीन भाडेकरू.

मी : अच्छा वकीलसाहेब!

पेठे : आपण परीक्षा देऊन गावी गेलात, त्यानंतर लगेच अवधानींच्या जागेत आम्ही शिरलो. भेट अर्थातच आज पहिल्यांदा. म्हणजे आम्हाला येऊन तीनेक महिने झाल्यानंतर. पण तुम्ही आम्हाला पेशानिशी ओळखलंत. आमची पाटी पाहून की आमचा कोट पाहून ?

मी : पाटी नाही, कोट पाहूनच !

[ दाबके हसतात. ]

आक्का : दाबके, तुमची काही तक्रार नाहीय म्हणालात.

मी : मग तुम्ही का थांबला आहात ?

[ दाबके नर्व्हस् होऊन खोलीवर जातात. ]

पेठे : थँक्यू व्हेरी मच. माझं आपल्याशी थोडं काम होतं. आपली वाट पाहून कोर्टात जाणार एवढ्यात आपण आलात...गाडी लेट झालेली दिसतेय.

मी : असेल थोडीशी.

पेठे : ( पुन्हा अंगचटीला जात ) माझं काम म्हणजे –

आक्का : पेठे, मालक आत्ताच प्रवासातून आले आहेत. त्यांना थोडी विश्रांती घेऊ दे. काम काय आत्ताच सांगितलं पाहिजे ?

मी : ( स्वतःला सोडवून घेत ) हे पाहा पेठे, वडिलांनी मला त्यासंबंधी कल्पना दिलीय.

पेठे : व्हेरी गुड ! मी पत्रात त्यांना सविस्तर कळवलं होतंच. गंमत काय झाली –

मी : ती माकडांची गंमत ना ? ती मी आपल्या पत्रात वाचलीय.

पेठे : म्हणजे तो मुद्दा झाला. आता नेक्स्ट मुद्दा. आपण आमच्या घरी येऊन रामदूतांचा प्रताप समक्ष बघणं. चक्षुर्वैसत्यम्. चला.

मी : नको. मग बघू. अहो मी आत्ता कुठं गाडीतून उतरतोय....बरंय. मग भेटूच.

आक्का : पेठे, कोर्टाची वेळ झाली ना तुमची ? ( पेठ्यांचं आक्कांच्या बोलण्याकडं दुर्लक्ष. )

पेठे : चहालाच चला की आता आमच्याकडं ! प्रवासाचा शीण एका मिनिटात जाईल, आमच्या होम डिपार्टमेंटच्या हातचा चहा घेतला की.

मी : नको. मी गाडीत चहा घेतलाय.

पेठे : पुन्हा एकदा. यू आर ए यंग मॅन.

मी : पण मला आता चहा नकोय.

पेठे : अहो कुठं तरी हॉटेलात जाऊन घेणारच ना !

आक्का : नाही. ते हातानं चहा करून घेतात.

पेठे : आणि जेवण ?

मी : ते आमच्या बाईंच्या खानावळीत. सहा वर्षं बाईंच्या खानावळीतच वाढलोय मी....

पेठे : म्हणून काय झालं ? आज आमच्या बाईंकडं या, चहाला आणि जेवायलासुद्धा, काय ?

आक्का : पेठे, तुम्हाला काय सांगितलं ? मालकांना विश्रांती हवीय्, तरी तुमचं तुणतुणं चालूच. चला बघू! मालक तुम्ही जा, वर जाऊन विश्रांती घ्या....

[ आक्का आत जातात. ]

पेठे : धाकटे मालक, हे काही बरोबर नाही हं. असं काय करताय ? आमचं होम डिपार्टमेंट तुमची वाट पाहातंय. ( कुसुम बाहेर येते. ) हे आमचं कुटुंब. बायका तशा धूर्त असतात हं. त्यांना तुमच्याकडून काम करून घ्यायचंय घराच्या दुरुस्तीचं. ( कुसुमला ) चहाचं आधण ठेवा. मालक येताहेत. ( 'मी' ला ) तुमच्या चहासाठी मुद्दाम थांबलो आहे मी कोर्टात जायचा.

मी : मला चहा नको. तुम्ही खुशाल कोर्टात जाऊ शकता.

[ 'मी' जाऊ लागतो. पेठे 'अहो....अहो' करत मागं. एवढ्यात दाबके ऑफिसला जायला बाहेर पडतात. कुसुम पटकन् आत जाते. ]

दाबके : ( स्वतःच्या घरात पाहात ) मंडळी, चहा कॅन्सल बरं का ?

पेठे : कॅन्सल नाही, पोस्टपोन्ड !

दाबके : आज तर स्टे ऑर्डर मिळाली !

पेठे : स्टे ऑर्डर ईज नॉट अ फायनल ऑर्डर मिस्टर. मी अपिलात जाऊ शकतो स्टे ऑर्डरविरुद्ध !

[ पेठे रागानं निघून जातात. दाबके हसत पेठ्यांच्या खिडकीकडं पाहातात. कुसुम रागानं खिडकी बंद करते. दाबके हसत निघून जातात. कुसुम दार उघडून बाहेर येते. खांबाला टेकून वर जिन्याकडं बघत असताना – काळोख ]

## दृश्य दुसरे

[ चारसहा दिवसांनी. 'मी' ची खोली. खोलीत पसारा. 'मी' वाचत बसला आहे. बाहेर कडी वाजते. ]

प्रभा : ( बाहेरून ) धाकटे मालक....अहो धाकटे मालक....

मी : कोण, प्रभाकर ना ? ये रे, दार उघडंच आहे, ये.

प्रभा : आज लौकर पळालास कॉलेजातून ?

मी : लौकर कसा ? तास संपल्यावर निघालो. हां, तुमच्याबरोबर चहासिगरेटी फुंकत बसलो नाही एवढंच.

प्रभा : तुम्ही संस्कृतिसंरक्षक नाही का ? ( बसतो. ) मित्रवर्य, आता तुझ्याकडल्या आपल्या फेऱ्या वाढणार बरं का !

मी : का रे ?

प्रभा : काय रे, तुझ्याकडं येताना ती टग्गल दिसली ती कोण ?

मी : टग्गल ? हां हां. दात पुढं, सुकट शरीर, कमरेवर पोर....अरे त्या मिसेस दावके नाहीत का ?

प्रभा : त्यांना मी ओळखतो मिस्टर. मी टग्गलबद्दल बोलतोय. ही टग्गल पूर्वी इथं कधी पाहिली नव्हती. अशी खांबाला टेकून उभी....नऊवारी पातळ. लेका, नऊवारीची इतकी ऐट आपण जन्मात कधी पाहिली नव्हती. सुंदर मुखडा....केसात वेणी घातलेली. एवढ्या भर दुपारीसुद्धा कशी दुपारीच्या फुलासारखी टवटवीत. आणखी जरा तपशील सर्वांगीण वर्णन करू ?

मी : नको.

प्रभा : मग ती कोण आहे ते सांग.

मी : पेठेवकिलांचं कुटुंब.

प्रभा : पेठेवकील ? ल. म. पेठे ? म्हणजे आपले ते पपैया थिअरी तर नाहीत ?

मी : पपैया थिअरी ?

प्रभा : येस ! पण बेट्याची बायको भलतीच सुंदर आहे रे ! तुझी ओळख झाली की नाही ?

मी : झालीय. पेठ्यांशी. त्यांच्या घराचं छप्पर नीट करून द्यायचंय मला.

प्रभा : पेठे मरू दे आणि त्याचं छप्पर उडत जाऊ दे. अरे अल्लानं त्या पेठेला छप्पर फाडून सौंदर्याचा जो खजिना बहाल केलाय, त्याची आणि तुझी ओळख झालीय की नाही सांग !

मी : अजून नाही.

प्रभा : तुला इथं येऊन चार दिवस झाले आणि अजून ओळख नाही ? झोपा काढत होतास की काय ?

मी : आय् ॲम् नॉट इंटरेस्टेड !

प्रभा : का ? तुझं लग्न ठरलंय म्हणून ? शिअर नॉन्सेन्स. लग्न ठरलंय म्हणजे झालं नाहीय ना ? लेका, लग्न झाल्यावर मग पुढं आहेच रे, एक पत्नीव्रत एके एकपत्नीव्रत !

मी : व्हॉट नॉन्सेन्स !

प्रभा : दोस्ता, तुझी तत्त्वंबित्त्वं बाजूला ठेव आणि आता लौकरात लौकर या पेठेबाईंशी ओळख करून घे. चांगल्या आणि सुंदर गोष्टीत वेळ घालवणं हे भयंकर पाप आहे. ऊठ – तत्काळ ऊठ – खाली जा आणि खांबाला टेकून उभ्या असलेल्या त्या सुंदरीला म्हणावं, हा माझा – म्हणजे तुझा खांदा असताना त्या लाकडी खांबाला किती त्रास देशील ? डिअर फ्रेंड, हेल्प हर टु हेल्प यू. तिचा नवरा बावळट आहे. कॉलेजात असताना पपैया थिअरीचा अभ्यास कर करून आयुष्यातल्या महत्त्वाच्या प्रॅक्टिकल-मध्ये तो नापास झालाय !

मी : पपैया थिअरी म्हणजे ?

प्रभा : येस. माझे दादाच एकदा त्यांच्या मित्रांना ह्या पेठ्याबद्दल सांगत होते. पपैयाचा आणि शक्तीचा दुरुपयोग. तर मित्रा, विचार कर. फार गंभीर समस्या आहे ही. तारुण्यानं मुसमुसलेल्या त्या सुंदरीनं अशा माणसाबरोबर सारा जन्म काढायचा हा केवढा अन्याय आहे ! या अन्या-याचं थोडं तरी परिमार्जन आपण नको का करायला ? ते एक सामाजिक कर्तव्य आहे. ते एक –

[ दार वाजतं. ]

मी : कोण आहे ?

पेठे : ( बाहेरून ) मीच आहे....येऊ का आत ?

मी : या, या पेठेसाहेब.

प्रभा : पेठेसाहेब ?

पेठे : ( आत येत ) पर्वत महंमदाकडं येत नाही तर महंमदानं पर्वताकडं गेलं पाहिजे, काय ? ( पेढे देत ) हं, घ्या. ( प्रभाला ) आपणही घ्या. आपण ?

प्रभा : मी तुमच्या मालकांचा मित्र – प्रभाकर जोग. इथं नागपुरातच असतो.

पेठे : प्रभाकर जोग म्हणजे आपण दादासाहेब जोगवकिलांचे सुपुत्र तर नाही !

प्रभा : करेक्ट !

पेठे : दादासाहेब आणि मी एकाच कॉलेजात होतो. लॉला. अर्थात ही वॉज सीनिअर.... ('मी'ला) कसा काय आहे पेढा ?

प्रभा : छान आहे.

पेठे : साताऱ्च्या एका अशीलानं तिकडचे खास कंदी पेढे पाठवले. म्हटलं, मालकसाहेबांना दाखवावा जरा मासला. काय ?

प्रभा : मालकसाहेबांवर बराच जीव दिसतोय आपला.

पेठे : किती ? थोडे चुकलात प्रभाकरपंत – म्हणजे आमचा जीव आहेच हो, पण मुख्य म्हणजे आमच्या होम डिपार्टमेंटचा मालकसाहेबांवर भारी जीव. हां. त्यांनीच आज्ञा केली. हा साताऱ्चा कंदी पेढा आधी मालकांना देऊन या.

प्रभा : नैवेद्यच म्हणा की ! मालकसाहेब, नैवेद्य गोड आहे ना ? असणारच ! सातारी कंदी पेढा.... (गातो) कशी ही साताऱ्याची तऱ्हा ऽऽ

पेठे : होम डिपार्टमेंट ऑर्डर नंबर टू. आता तुमच्याकडून आक्कांकडं जायचं आणि त्यांना पेढे द्यायचे.... गेले दोन दिवस तेलंगआक्कांची आणि होम डिपार्टमेंटची विशेष गट्टी वाढलीय हं. मालक, आणखी जरा त्रास देईन म्हणतोय तुम्हाला.

मी : तुमचं छप्पर नीट करायचंय तेच ना ?

पेठे : रॉंग ! आज आपण आमच्याकडं चहाला यायचं आहे. सायंकाळी.

मी : चहाला ?

प्रभा : हो – आधी चहाफराळ, मग जेवण. काय वकीलसाहेब ?

पेठे : अगदी बरोबर. मग येणार ना चहाला ? पाहा. आज आता नाही म्हणू नका. तुम्ही आल्यापासून रोज मी विनंती करतोय....

प्रभा : होम डिपार्टमेंटच्या ऑर्डरप्रमाणं.

पेठे : येस्. आणि रोज तुम्ही नाही म्हणताय. आज जर आला नाहीत चहाला तर आमचा चहा कायमचा बंद होईल.

प्रभा : अरे अरे, तो येईल – मी सांगतो. जा रे एवढे बोलावताहेत वकील-साहेब तर.

मी : पण तुझ्याकडं आज आपण अभ्यासाला बसणार होतो.

प्रभा : हो ? त्याचं काय मोठं ? अभ्यास काय, केव्हाही होईल. हे स्पेशल आमंत्रण आहे. अरे चहाला जाणं हे एक सामाजिक कर्तव्य आहे. असं प्रेमाचं आमंत्रण स्वीकारणं हे एक.... वकीलसाहेब, सामाजिक बंधन म्हणू की नैतिक बंधन म्हणू ?

पेठे : काहीही म्हणा हो. मालकांना चहासाठी आज होम डिपार्टमेंटपुढं हजर करणं महत्त्वाचं. काय ?.... मग हे ठरलं.

प्रभा : ठरलं म्हणजे ? प्रश्नच नाही. हे बघ, तू स्वस्थ चित्तानं यांच्याकडं चहाला जा. स्वस्थ चित्तानं गप्पागोष्टी कर. स्वस्थ चित्तानं....आजच्या आपल्या अभ्यासाचं डोक्यातून काढून टाक. काय वकीलसाहेब ? तू हे सामाजिक कार्य करतो आहेस. तुला कुणी काही म्हणणार नाही. कुणी म्हणेल काही वकीलसाहेब ?

पेठे : म्हणेल ! आमच्या शेजारचे दावके जरूर म्हणतील.... त्यांची सारखी टेहळणी असते ना आमच्यावर ! मी इथं वर येतानासुद्धा ते बायकोला बोलावून दाखवत होते मी मालकांच्याकडं येतोय ते.... त्याच्याबद्दलची कंप्लेंट मी सवडीनं करणारच आहे मालकांकडं. तुम्हांला सांगतो, आतासुद्धा ते इथं दाराआड उभे असणार.

[ एवढ्यात दावक्यांची किंकाळी. जिन्यावर धडपडत येण्याचा आवाज.... काळ्याचं हसणं ऐकू येतं. ]

[ काळ्या वर येतो. हातात काठी. लहानशी. पेठे घाबरतात. तो हसतो. ]

पेठे : पाहिलंत ना ? दाराआड दावकेच उभे असणार. मालक, आमच्या होम डिपार्टमेंटलासुद्धा या काळ्याची भीती वाटते.

मी : फार भला जीव आहे तो पेठेसाहेब. त्याच्यावर माया करावी, दामदुपटीनं तो तुमच्यावर माया करील. तुमच्या कुटुंबाला सांगा, माझ्या आधी या काळोजींना चहाला बोलवा. काळोजी, पेढा घेणार ? चांगला साताऱ्याचा कंदी पेढा आहे. ( पेठ्यांजवळचा काळोजीला देतो. ) मित्रा, बस –

पेठे : मग निघू मी ?

प्रभा : जरूर. हा येतोय. काळजी करू नका असं होम डिपार्टमेंटला सांगा.

मी : पेठेसाहेब, एक मिनिट....वडिलांनी आपल्याला भाड्याविषयी कळवलं होतं....

पेठे : ते लक्षात आहे माझ्या. सगळी बाकी एकदम चुकती करायची म्हणून जरा थांबलोय, एवढंच ! बरंय – सायंकाळी नक्की येताय –

मी : बघू....

प्रभा : हो ! ( पेठे जातात. )

मी : प्रभाकर, तुझं काय अडलं होतं हा चावटपणा करायला ?

प्रभा : कशी काय झाली गंमत ?

मी : एकदम झकास ! शहाण्या, पण तू इथं समोर असताना पेठेसाहेबांनी तुला एकदादेखील म्हटलं नाही, तुम्हीदेखील चहाला या म्हणून !

प्रभा : आँ! खरंच की!

मी : (वेडावून) म्हणे सामाजिक कर्तव्य! केवढे मनोरथ रचले होतेस!

प्रभा : ढासळले! पपैया थिअरीनं पार जमीनदोस्त केले. (उशी छातीशी धरून) असंच आहे वाया दुनियेचं. आमच्यासारख्या उपाशी जमिनीवर पावसाचा वर्षाव नाही होणार. तो होणार तुमच्यासारख्या समुद्रावर. (दारापर्यंत जातो.)

मी : अहो ती उशी ठेवा इथं महाराज!

प्रभा : (उशीवरचा मजकूर वाचतो) स्वीट ड्रीम. घ्या. फुकटची स्वप्नंसुद्धा नशीबी नाहीत आमच्या. (उशी फेकतो.) घ्या.

[ 'मी' उशी झेलतो. ]

प्रभा : वेस्ट ऑफ लक फॉर स्वीट इन्व्हिटेशन फ्रॉम मिस्टर....सॉरी, मिसेस पेठे.

[ हसत निघून जातो. – काळोख ]

## दृश्य तिसरे

[ पेठ्यांची खोली.

पेठे घाईघाईनं खोलीत शिरतात. 'मी' दारात उभा. ]

पेठे : सुस्वागतम्... या.... अच्छा, रांगोळी बघताय काय? आमच्या होम डिपार्टमेंटची कला आहे ती.

मी : फार सुरेख काढलीय रांगोळी. ('मी' आत येतो.)

पेठे : सो, धिस ईज अवर पॅलेस! हे आमचं ऑफिस.... (पुस्तकांची शोकेस दाखवत) हे बुक डिपार्टमेंट. आत किचन डिपार्टमेंट. आणि हे.... (कोट काढून खुंटीवर ठेवू लागतात.)

मी : हे वॉर्डरोब डिपार्टमेंट आणि दाराआड आहे ते शू डिपार्टमेंट!

पेठे : वा! तुम्हालासुद्धा विनोद आवडतात असं दिसतंय!

मी : मला फक्त चांगले विनोद आवडतात!

[ आत दाराशी कुसुम उभी ]

पेठे : आवडू देत. (देव्हारा दाखवत) ते गॉड डिपार्टमेंट. ('मी' नमस्कार

करतो. ) तुम्ही चक्क नमस्कार केलात !

मी : पेठे, जिथं इतकी फुलं आहेत, मूर्ती आहे, भक्ती आहे, तिथं आपोआप हात जोडले जातात माझे.

पेठे : म्हणजे तुम्ही आमच्या कुटुंबाच्याच जातीचे दिसताय....देवभक्त! ( हसतात. कुसुमला ) अहो जरा पुढं तर याल ? ( कुसुम पुढं येते. नमस्कार करते.) इथं अंधारच असतो बहुतेक वेळ. दिसावं तसं दिसत नाही इथं.... इथूनच कुठून तरी पाणी येतं. मागच्या पडवीतून इथं ते येतं आणि मग.... ( कुसुमला ) तुम्ही काही सांगता ?

कुसुम : अं ?

पेठे : नाही म्हटलं, तुम्ही काही सांगता ?

मी : मागच्या बाजूला ती उंच भिंत आहे ना, त्यामुळं इथं काळोख आहे. पण ती भिंत पलीकडच्या मालकानं बांधलीय. चांगली साठ वर्षांपूर्वी. वडील सांगतात, तिकडल्या पडदानशीन बायकांकडं कुणी बघू नये म्हणून तिथल्या मालकानं ती बांधली आहे.

पेठे : पण त्यामुळं वारा किंवा उजेड यायची काही सोयच उरलेली नाही.

मी : पण घर स्वस्तात मिळण्याची सोय झालीय आमच्या भाडेकरूंची.

पेठे : पैशाचं सोडा हो. पण घरात वारा आणि उजेड कसा भरपूर पाहिजे, काय ?

[ कुसुम गप्पच. पेठे दाबक्यांच्या बाजूची भिंत दाखवतात. ]

पेठे : ही भिंतसुद्धा अशीच थोडी वाढवायला पाहिजे.

मी : काय किल्लाबिल्ला बांधून घ्यायचा विचार आहे की काय मालकांच्या पैशानं ?

पेठे : नाही. काही काही माणसांना जिराफासारखी उंच मान मिळालेली असते. ती माणसं टाचेवर उभी राहून इथं डोकावत असतात.

[ दाबक्यांच्या घरातून कुणी तरी धडपडल्याचा आवाज. कुसुम स्मित करते. ]

मी : जिराफाच्या पायाखालचं स्टूल निसटलेलं दिसतंय.

[ हसतो. कुसुम हसते. ]

पेठे : आणखी म्हणजे.... हो, यांचीच मागणी आहे — आत एक लहानसं न्हाणीघर, जमल्यास एकादी खिडकी, आणि ही फरशीसुद्धा....

मी : तुम्ही फक्त गळतंय कुठं ते....

पेठे : सांगतो ना.... पण त्याआधी शेवटची गोष्ट.... ( कुसुमला ) तुम्ही सांगता ? ( कुसुम गप्प. ) आमच्या ह्या होम डिपार्टमेंटला इथं एक ओटा

बांधून हवाय. त्यांच्या नव्यानव्या कल्पना असतात. वाचलं असेल कुठं तरी उभ्यानं स्वयंपाक करावा म्हणून ! वाचनाची आवड आहे.

मी : अच्छा, म्हणजे तुम्हाला इथं एक किल्ला बांधून हवाय ! आतल्या बाजूला हवेशीर हवेली.... एखादं सुंदरसं रंगीत कारंजं ! हे पाहा, ही कामं माझ्या अखत्यारीतील नाहीत. मला वडिलांना विचारावं लागेल. ( 'मी' कुसुमकडं बघतो. ती बघते. ) तुम्ही मला चहाला बोलावलंत, आणि....

कुसुम : चहा तयार आहे.

पेठे : चला, आपण ऑफिसात बघू.

[ 'मी' आणि पेठे तिथंच टेबलाशी बसतात. कुसुम चहा आणि खायला घेऊन येते. दोघं खाताना बोलतात. ]

पेठे : घरातलं गळणं आधी काढलं पाहिजे. खूप ठिकाणी गळतं. मालक, तुम्ही असं करा, पाऊस पडेल तेव्हा प्रत्यक्षच या आणि पाहून जा. ते जास्त चांगलं.

मी : पण पाऊस पडेल तेव्हा आपण घरी असायला पाहिजे, किंवा आपण घरी असाल तेव्हाच पाऊस पडला पाहिजे.

पेठे : ओ नो ! तसं मुळीच नाही. मी घरी नसलो तरी आपण इथं येऊ शकता. आमच्या मिसेस बोलावतील तुम्हाला. काय हो ? ( कुसुम गप्प. ) ( पेठे भराभरा खाऊन उठतात. ) आमचं असं आहे, खाणं संपतासंपता आमची झोप सुरू होते. आता हात धुतले की आम्ही पाय पसरून घोरायला लागणार. तुमचं होऊ द्या सावकाश. ( आत जातात. )

[ स्तब्धता ]

मी : ( कुसुमला ) माझ्या गॅलरीतून गुलाबाच्या कुंड्या दिसतात त्या —

कुसुम : मीच लावली आहेत ती कलमं. तुम्हाला गुलाब आवडतात.... हो ना ?

मी : हो. तुम्ही कसं ओळखलंत ?

कुसुम : गुलाब सगळ्यांनाच आवडतात म्हणून !

[ दोघं हसतात. पेठे आतल्या दारात येतात. ]

पेठे : मग हे ठरलं. धारातीर्थी पडण्यापूर्वी सांगतो. पाऊस आला की तुम्ही इथं यायचं. ( वरच्या खोलीकडं जायला निघतात. ) बसा वाटल्यास.

मी : नाही. रात्री सिनेमाला जायचंय.

पेठे : रात्री ना ? मग आत्ता काय त्याचं ? बसा हो.... ( पेठे जातात. )

कुसुम : उभे का ? बसा ना.

मी : हो. ( बसतो ) पेठेसाहेब आता संध्याकाळीच झोपायला गेले ?

कुसुम : आली असेल झोप.... गेले. ( हसते. आत जाते. 'मी' विचारात पडतो. कुसुम परत येते. )

मी : } संध्याकाळी म्हणजे....
कुसुम : } आज कॉलेज लौकर सुटलं ?

मी : हो. पीरिएड्स संपल्यावर कॉलेज सुटतंच, नाही का ? (हसतो)

[ पुन्हा स्तब्धता. ]

कुसुम : } तुम्ही यंदा....
मी : } पेठेसाहेब रोज असे.... सॉरी, बोला. काय म्हणत होता ?

कुसुम : तुम्ही यंदा थर्ड इअरला ना ?

मी : हो. हे वर्ष संपलं की शिक्षण संपवायचं.

कुसुम : पुढं प्रॅक्टिस करणार असाल ?

मी : विचार तरी आहे असा.

मी : } प्रश्न काय पडतो —
कुसुम : } कुठं ? इथं नागपूरलाच ?

मी : काय ?

कुसुम : म्हटलं, इथं नागपूरलाच प्रॅक्टिस करणार की गावाला ?

मी : केली प्रॅक्टिस तर नागपूरलाच.

कुसुम : हं. नागपूर म्हणजे शहर पडतं मोठं.... (स्तब्धता. 'मी' उठायला बघतो.) जायची घाई आहे ?

मी : अगदी तसंच नाही, पण....

कुसुम : बसा नं. ('मी'ची चुळबुळ. स्तब्धता.) विचार करताय ? काय बोलावं म्हणून ?

मी : अं ? नाही.... नाही....

कुसुम : तुमची मघाशी काय कल्पना झाली ? आम्हाला इथं रंगीत कारंजं हवंय ?

मी : छे.... छे.... मी ते आपलं गंमतीनं —

कुसुम : तुम्ही कधी गंमतीनं बोलत असाल असं नाही वाटत.

मी : कशावरून ?

कुसुम : आता तर तुम्ही असं बोलताय.... मी इथं आहे म्हणून ?

मी : } तसंच नाही.... पण काय —
कुसुम : } तुम्ही कॉलेजात मुलींशी....

[ आता एकाच वेळी बोलणं होत आहे या जाणीवेनं दोघं हसतात. पुन्हा तसंच घडतं. ]

मी : } सॉरी !
कुसुम : } सॉरी !

[ हसतात. ]

मी : } बोला ना.
कुसुम : } बोला ना.

[ हसतात. थांबतात. ]

मी : सॉरी ! बोला ना ! ( दोघं हसतात. )

कुसुम : आधी कुणी बोलायचं म्हणून आपण 'छाप की काटा' करायचा का ? तुमच्याकडं नाणं आहे ? दोन्ही बाजूला छापच असलेलं ? ( 'मी' हसतो. )

कुसुम : मला कॉलेजात जायची खूप इच्छा होती.

मी : मग ?

कुसुम : नाही जमलं.

मी : का ?

कुसुम : मी मॅट्रिकलाच नापास झाले. गणितात.

मी : खरं म्हणजे मॅट्रिकला गणित आणि इंग्रजी या दोन्ही विषयात नापास होतात.

कुसुम : असं ? मला हे माहीत नव्हतं म्हणून मी आपली इंग्रजीत पास झाले !

[ 'मी' घड्याळात बघतो. उठू लागतो. ]

कुसुम : घड्याळात पाहिलं तर वेळच जात नाही, नाही ? बसा ना.

मी : नाही. मला आता जायला हवंय.

कुसुम : काही विशेष ?

मी : हो. जरा बाजारात जायचंय. तिथून मग रात्री पिक्चरला जायचंय व्हरायटीला.

कुसुम : जरा थांबाल ? ( खोलीतला दिवा लावते. ) देवाजवळ दिवा लावते. ( 'मी' थांबतो. कुसुम निरांजन आणते. ) कुठलं पिक्चर लागलंय व्हरायटीला ?

मी : मारी वालावास्का. बाईचं नाव आहे हे.

कुसुम : नेपोलिअनची प्रेयसी ना ? मग तिचं नाव आहे मारी वाल्यूस्का. त्यांची प्रेमकहाणी मी वाचलीय. मला खूप आवडली. तुम्ही वाचलीय ?

मी : नाही. म्हणून तर पिक्चर बघायला जातोय.

कुसुम : मग बघताना नाव ऐका हं तिचं. 'वाल्र्स्का' की 'वाल्यूस्का' ते. ( थांबते. )

मी : तुम्ही देवाजवळ दिवा —

कुसुम : बघा, बोलताना विसरलेच मी— ( दिवा लावते. )

मी : निघतो मी.

कुसुम : म्हणजे ? दिवा लावल्यावर लगेच घराबाहेर जायचं नसतं हा संकेत

माहीत नाही तुम्हाला? बसा दोन मिनिटं. ('मी' घड्याळात बघणार एवढ्यात....) अं हं. अगदी एकशेवीस सेकंद मोजायला नकोत काही. मग रात्री वाड्यात परत यायला तुम्हाला उशीर होणार खूप.

मी : हो. आक्का बिचाऱ्या दिंडीदरवाजा उघडतात म्हणून बरंय.

कुसुम : निघालात? ('मी' जाऊ लागतो.)

मी : हो. का?

कुसुम : काही नाही. ('मी' जातो. कुसुमचं लक्ष 'मी'च्या पडले... रुमालाकडं जातं. कुसुम धावत दारापर्यंत जाते.) अहो तुमचा रुमाल –
[ रुमाल हातात धरून उभी राहाते. – काळोख ]

## दृश्य चवथे

[ दावक्यांच्या घरात दिवा लागतो. प्रकाश येतो. दावके बाहेर येतात. परत आत जातात. कुसुम दार किलकिलं करून उभी. प्रकाश नाहीसा होतो. बाहेर रिक्शाचा आवाज.... रिक्शावाला आणि 'मी'चे संवाद –
मी – काय रे, व्हरायटीहून इकडं यायला दोन रुपये?
रिक्शावाला – साहेब, रात्रीचा टायम हाय. सिनेमाला पैसे देता तसे गरीबाला पण द्या की!
मी – ठीक आहे.... ठीक आहे.
कुसुम अंदाज घेते. धावत जाऊन दार उघडते. आत येताना 'मी' धडपडतो. कुसुम 'मी' ला सावरते. ]

मी : कोण? पेठेबाई, तुम्ही?

कुसुम : हो. तुमचीच वाट पाहात होते. मला तुमच्याशी बोलायचंय.

मी : माझ्याशी? आणि इथं? अशा वेळी?

कुसुम : मग दुसरीकडं कुठं आणि केव्हा बोलणार मी?

मी : अहो पण वाड्यात कुणी जागं असेल.

कुसुम : अं हं. कुणीही जागं नाहीय. जागे आहोत फक्त आपण. मला....मला तुम्ही हवे आहात. तुम्ही मला पहिल्यांदा दिसलात तेव्हापासून आवडला आहात. मला तुमचा आधार हवाय.

[ त्याचे हात धरते. ती बोलत असताना 'मी' काही बोलण्याचा प्रयत्न करतो....पण निष्फळ. ]

मी : तुम्हाला पेठेबाई, काय वेड लागलंय ?

कुसुम : हो ! म्हणूनच जागी आहे ना मी ! म्हणूनच कुणाचीही पर्वा न करता इथं तुम्हाला भेटलेय ना मी ?

[ दाबके खोकतात. दोघं लपतात. ]

मी : हे पाहा....तुम्ही आधी घरी जा तुमच्या.

कुसुम : मला ते घर नको आहे....ते घर मला खायला येतं. तुमच्या पाया पडते मी. सारा जन्म तुमच्याबरोबर काढायला तयार आहे मी....वाटल्यास आता आपण बाहेर जाऊ या कुठंही....( 'मी' चा हात धरते. 'मी' ल बाहेर नेऊ बघते. 'मी' क्षणभर तसाच गांगरलेला. )

[ इतक्यात बाहेरून काळ्या येतो. 'मी' ला धरतो. कुसुम घाबरून पळून जाते. खोलीत शिरते. 'मी' तसाच उभा. दाबक्यांचा दिवा लागतो. प्रकाश येतो. काळ्या 'मी' ला घेऊन बाहेर जातो. दाबके कानोसा घेतात. दरवाजापर्यंत येतात. काळ्या दरवाजात आलेला पाहून भिऊन खोलीत जातात. दिवा बंद करतात. आतून कडी लावण्याचा आवाज. – काळोख ]

## दृश्य पाचवे

[ 'मी' ची खोली. आक्का, पेठे बसलेले. दाबके संतापलेले. फेऱ्या घालताहेत. ]

दाबके : रात्रीच्या प्रकरणाचा प्रथम सोक्षमोक्ष झाला पाहिजे. हां.... ( फेऱ्या घालत पेठ्यांकडं बघत आहेत. कुणीच बोलत नाही. ) आत्ताच्या आत्ता आणि इथल्या इथं ! ( फेऱ्या ) ह्यांना इथं पाहून मी मुद्दामच आलो. ( फेऱ्या ) तुम्ही ऐकताय ना मालक ?

मी : ( प्रथम गांगरलेला. मग एकदम सुचून ) दाबके, पेठे तुमच्या अगोदर आले आहेत इथं.

पेठे : एक्झॅक्टली ! फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड् !

दाबके : आले असतील. पण त्यांच्याअगोदर मी इथं आज चारपाच दिवस फेऱ्या टाकतोय त्याचं काय ?....वाड्यात काय चाललंय ? इथं सभ्य माणसं राहातात.....सांगायला यावं तर तुमच्या दाराला कुलूप !

आक्का : त्यांनी सांगितलं ना ते मित्राकडं राहायला होते चार दिवस म्हणून ? ( दाबक्यांच्या फेऱ्या पाहून वैतागून ) तुमच्या फेऱ्या थांबवाल का ? काही सुचत नाही हो मग कुणाला बोलायला.

दाबके : सुचायला आहे काय कुणाकडं ?

मी : दाबके, तुम्ही तिथं बसा.

दाबके : अरे झोपा उडाल्या आहेत आमच्या. ( फेऱ्या ) तुम्ही, मालक, ताबडतोब या प्रकरणात लक्ष घालून.......

मी : आधी पेठे आणि आक्का काय म्हणताहेत ते.... हं, बोला आक्का.

आक्का : चार दिवस पाऊस पडला. पेठ्यांच्या घरात हा चिखल.

दाबके : ( मध्येच ) कसल्या पावसाच्या आणि चिखलाच्या गोष्टी ऐकताय ! पावसाळ्यात पाऊस पडणार ! चिखल होणार ! मालक, रात्रीचा प्रकार —

मी : दाबके–

पेठे : चिखल म्हणजे रेग्युलर दलदल ऑफ तिबेट.

आक्का : पेठे – ( पेठे गप्प होतात. ) यांच्या घरातली नाली भरभरून वाहात होती, आणि तिच्यातून काय यावं पेठ्यांच्या खोलीत ? कागदाच्या होड्या.
[ दाबक्यांच्या फेऱ्या एकदम थांबतात. ]

पेठे : लिटरली आरमार ! आरमाराबरोबर चिठ्ठ्या.

दाबके : आक्का, यांच्या नादी लागून कसल्या पोरकट तक्रारी करताय तुम्ही ? आमची पोरं सोडत असतील होड्या.

मी : आणि त्यातल्या चिठ्ठ्या ?

आक्का : त्या घाणेरड्या चिठ्ठ्या पण तुमची पोरंच लिहितात ?

पेठे : दॅट्स द मेन कंप्लेंट ! ( दाबके फेऱ्या घालू लागतात. )

आक्का : फेऱ्या पुरेत आता.... इथं असे समोर बसा.

दाबके : रात्रीचा प्रकार, आक्का, तुम्ही ऐकाल तर —

आक्का : ऐकलाय. तुम्ही तोंडाशी कर्णा धरून वाड्यात सांगत सुटला आहात तोच ना ?

दाबके : मालक, चार दिवसांपूर्वी रात्री दीडएकच्या सुमाराला आमच्या या शेजाऱ्यांच्या दाराला बाहेरून कुणी तरी कडी लावली.

पेठे : आमच्या दाराशी यांचा संबंध काय मालक ? कुणी कडी घालू दे की

[ त्याचे हात धरते. ती बोलत असताना ‘ मी ’ काही बोलण्याचा प्रयत्न करतो....पण निष्फळ. ]

मी : तुम्हाला पेठेबाई, काय वेड लागलंय ?

कुसुम : हो ! म्हणूनच जागी आहे ना मी ! म्हणूनच कुणाचीही पर्वा न करता इथं तुम्हाला भेटलेय ना मी ?

[ दाबके खोकतात. दोघं लपतात. ]

मी : हे पाहा....तुम्ही आधी घरी जा तुमच्या.

कुसुम : मला ते घर नको आहे....ते घर मला खायला येतं. तुमच्या पाया पडते मी. सारा जन्म तुमच्याबरोबर काढायला तयार आहे मी....वाटल्यास आता आपण बाहेर जाऊ या कुठंही....( ‘ मी ’ चा हात धरते. ‘ मी ’ ल बाहेर नेऊ बघते. ‘ मी ’ क्षणभर तसाच गांगरलेला. )

[ इतक्यात बाहेरून काळ्या येतो. ‘ मी ’ ला धरतो. कुसुम घाबरून पळून जाते. खोलीत शिरते. ‘ मी ’ तसाच उभा. दाबक्यांचा दिवा लागतो. प्रकाश येतो. काळ्या ‘ मी ’ ला घेऊन बाहेर जातो. दाबके कानोसा घेतात. दरवाजापर्यंत येतात. काळ्या दरवाजात आलेला पाहून भिऊन खोलीत जातात. दिवा बंद करतात. आतून कडी लावण्याचा आवाज. – काळोख ]

## दृश्य पाचवे

[ ‘ मी ’ ची खोली. आक्का, पेठे बसलेले. दाबके संतापलेले. फेऱ्या घालताहेत. ]

दाबके : रात्रीच्या प्रकरणाचा प्रथम सोक्षमोक्ष झाला पाहिजे. हां.... ( फेऱ्या घालत पेठ्यांकडं बघत आहेत. कुणीच बोलत नाही. ) आत्ताच्या आत्ता आणि इथल्या इथं ! ( फेऱ्या ) ह्यांना इथं पाहून मी मुद्दामच आलो. ( फेऱ्या ) तुम्ही ऐकताय ना मालक ?

मी : ( प्रथम गांगरलेला. मग एकदम सुचून ) दाबके, पेठे तुमच्या अगोदर आले आहेत इथं.

पेठे : एक्झॅक्टली ! फर्स्ट कम फर्स्ट सर्व्हड् !

दाबके : आले असतील, पण त्यांच्याअगोदर मी इथं आज चारपाच दिवस फेऱ्या टाकतोय त्याचं काय ?....वाड्यात काय चाललंय ? इथं सभ्य माणसं राहातात.....सांगायला यावं तर तुमच्या दाराला कुलूप !

आक्का : त्यांनी सांगितलं ना ते मित्राकडं राहायला होते चार दिवस म्हणून ? ( दाबक्यांच्या फेऱ्या पाहून वैतागून ) तुमच्या फेऱ्या थांबवाल का ? काही सुचत नाही हो मग कुणाला बोलायला.

दाबके : सुचायला आहे काय कुणाकडं ?

मी : दाबके, तुम्ही तिथं बसा.

दाबके : अरे झोपा उडाल्या आहेत आमच्या. ( फेऱ्या ) तुम्ही, मालक, ताबडतोब या प्रकरणात लक्ष घालून........

मी : आधी पेठे आणि आक्का काय म्हणताहेत ते.... हं, बोला आक्का.

आक्का : चार दिवस पाऊस पडला. पेठ्यांच्या घरात हा चिखल.

दाबके : ( मध्येच ) कसल्या पावसाच्या आणि चिखलाच्या गोष्टी ऐकताय ! पावसाळ्यात पाऊस पडणार ! चिखल होणार ! मालक, रात्रीचा प्रकार —

मी : दाबके–

पेठे : चिखल म्हणजे रेग्युलर दलदल ऑफ तिबेट.

आक्का : पेठे – ( पेठे गप्प होतात. ) यांच्या घरातली नाली भरभरून वाहात होती, आणि तिच्यातून काय यावं पेठ्यांच्या खोलीत ? कागदाच्या होड्या. [ दाबक्यांच्या फेऱ्या एकदम थांबतात. ]

पेठे : लिटरली आरमार ! आरमाराबरोबर चिठ्ठ्या.

दाबके : आक्का, यांच्या नादी लागून कसल्या पोरकट तक्रारी करताय तुम्ही ! आमची पोरं सोडत असतील होड्या.

मी : आणि त्यातल्या चिठ्ठ्या ?

आक्का : त्या घाणेरड्या चिठ्ठ्या पण तुमची पोरंच लिहितात ?

पेठे : दॅट्स द मेन कंप्लेंट ! ( दाबके फेऱ्या घालू लागतात. )

आक्का : फेऱ्या पुरेत आता.... इथं असे समोर बसा.

दाबके : रात्रीचा प्रकार, आक्का, तुम्ही ऐकाल तर —

आक्का : ऐकलाय. तुम्ही तोंडाशी कर्णा धरून वाड्यात सांगत सुटला आहात तोच ना ?

दाबके : मालक, चार दिवसांपूर्वी रात्री दीडएकच्या सुमाराला आमच्या या शेजाऱ्यांच्या दाराला बाहेरून कुणी तरी कडी लावली.

पेठे : आमच्या दाराशी यांचा संबंध काय मालक ? कुणी कडी घालू दे की

कुलूप घालू दे.

दावके : आक्का, ह्यांच्या वायकोनंच कडी घातली होती.... हो. होऊन जाऊ द्या समोरासमोर. वाई दिंडीशी गेल्या, वाट बघत थांवल्या....

मी : दावके, घाणेरड्या चिठ्ठयांवद्दल आधी बोलाल का ?

पेठे : त्या चिठ्ठया, मालक, यांच्याकडून येत होत्या. आम्हीही म्हणतो, व्हायचं ते समोरासमोर होऊ द्या. ( दावक्यांच्या फेऱ्या. )

आक्का : दुसऱ्याच्या डोळयातलं कुसळ पाहायच्या आधी स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ पाहा दावके. ( 'मी' ला ) पेठेवाईंनी मला दाखवल्या आहेत त्या चिठ्ठया.

दावके : त्या काय कुणाकडूनही चिठ्ठया लिहून घेऊन येतील. पण आक्का, मी स्वतः डोळयांनी तो प्रकार पाहिलाय. वाईंनी कुणाला तरी दरवाजा उघडला. मग दोघांची कुजबूज सुरू झाली. मला वाटलं, दोघं वाहेर पळून गेले. दिवा लावून पुन्हा वघणार तर तो वेडा आला ना धावून ! मी तर दिंडीदरवाजाच वंद करून ठेवणार होतो. चोर वरोवर जाळ्यात आला असता. ( फेऱ्या. क्षणभर कुणीच बोलत नाही. ) मी मनाशी अंदाज बांधलाच आहे म्हणा.... ( फेऱ्या ) मालक आता वोलताहेत का वघा आक्का.

आक्का : आम्ही चिठ्ठयांवद्दल बोलायला आलो आहोत. आम्ही त्यावद्दलच बोलणार.

पेठे : येस ! चिठ्ठया कोण पाठवतं, का पाठवतं.... ( दावके हसतात. )

मी : ही हसण्यासारखी गोष्ट नाहीय दावके.

दावके : अं हं. मी हसलो दरवाजातल्या प्रकाराला.... मालक, त्या प्रकरणाच निकाल लावा.... आम्ही निघालो.

मी : आणि चिठ्ठयांवद्दल ?

दावके : मालक, ही मंडळी विषय वदलताहेत आणि तुम्ही त्यांना सामील होताहात. एक सांगा, पेठे तुमच्याकडं वारंवार का येत असतात ?

मी : हा प्रश्न विचारणारे तुम्ही कोण ?

पेठे : मालक, वकिलीचा अभ्यास उपयोगी पडतोय हो तुमच्या !

आक्का : खरं तर दावके, तुम्ही होड्यांचा विषय वदलताय. पेठेवाई विचारी ना कुणाच्या अध्यात ना मध्यात.

दावके : असं ? मग मध्यान्हरात्री दिंडीदरवाजाजवळ त्यांचं काय काम होतं ?

आक्का : काहीही असेल. तुम्ही कोण विचारणारे ?

पेठे : वाहवा ! आक्का, तुम्हीदेखील लॉ कॉलेज जॉइन करा आता !

दावके : मालक, आमचे शेजारी आणि त्यांची पत्नी दोघंही सरळ नाहीत

एवढं लक्षात ठेवा.

मी : कोण सरळ आहे आणि कोण वाकडं आहे तेवढं समजतं मला.

दाबके : समजत असणारच हो. एवढा वकिलीचा अभ्यास करताय........पण असं आहे, तुमचं पोरवय आहे —

आक्का : त्यांच्या वयाशी काय करायचंय तुम्हाला ?

दाबके : मला काहीच करायचं नाहीय हो. पण पोरवयाचा गैरफायदा घेणारी दुसरी माणसं आहेत म्हणून सांगितलं. ही माणसं रात्रीअपरात्री आपल्याच घराला कड्या लावतात, दिंडीजवळ जाऊन कुणाकुणाला भेटतात. मी बरोब्बर पाळतीवर आहे. वेळ आली की मी सरळ मोठ्या मालकांना सविस्तर पत्र लिहून कळवीनच.

मी : मला काय दम देताय ?

आक्का : आपण स्वतःच काही तरी उगाच कंड्या पिकवायच्या —

दाबके : हॅं ! मला कारणच काय कंड्या पिकवायचं ? जे स्वतः चार दिवसांपूर्वी पाहिलं....

पेठे : ( विचारात पडतात. मग चुटकी वाजवतात. ) वन मोमेंट....मालक, चार दिवसांपूर्वी तुम्ही स्वतः रात्री सिनेमाला गेला होता, बरोबर ?
[ आक्का 'मी' कडं बघतात. 'मी' कावराबावरा. ]

मी : बरं, मग ?.... पण दाबके म्हणताहेत ती रात्र आणि मी आलो ती रात्र –

पेठे : वेट ! लेट मी आर्ग्यू. तुम्ही त्या रात्री वाड्यात परत आलात....सिनेमा पाहून. राइट ?

मी : पण —

पेठे : लेट मी फिनिश. तुम्हाला काही कुणी दिसलं दिंडीपाशी ? ( 'मी' गप्प राहाणार, इतक्यात ) लेट अस् गो पॉइंट बाय पॉइंट....ह्या होड्यावाल्यांच्या होड्या त्यांच्याच गळ्यात अडकवतो मी. तुम्हाला दार कुणी उघडलं ?

मी : कुणी म्हणजे ?

आक्का : ( चटकन ) मी उघडलं ! नेहमी मीच उघडते दार. माझी झोप इतकी जागृत असते, जरा कुठं खुट्........

पेठे : आता जास्त काही बोलू नका.... ( खाली बसत ) दॅट्स ऑल युवर ऑनर. माझं आर्ग्युमेंट सरळ आणि स्वच्छ आहे. काय मालक, आहे ना ? ( टाळीसाठी हात पुढं करतात. )

आक्का : पण पेठे —

पेठे : आता होड्यांबद्दल. 'मालक, आमच्या विद्वान आरमार नायकांना

कोर्टापुढं खेचू का बोला! होड्या येण्याची दिशा, होड्यातल्या हँड-रायटिंग....होड्यांचा कागद....

आक्का : दाबके, आता तरी आमच्या तक्रारीचा सोक्षमोक्ष लावाल?

पेठे : होड्यात पाणी शिरलंय आक्का....आता सोक्षमोक्ष कसला? ओन्ली मोक्ष! जलसमाधी घेऊन! काय मालक?

मी : दाबके, आता एकच सांगतो, होड्यांचा प्रकार लगेच थांबला पाहिजे. तुम्ही सारखी जी पाळत ठेवताय मिसेस पेठ्यांवर, तीसुद्धा लगेच थांबली पाहिजे.

दाबके : मालक, या भानगडीत खरा चोर सुटतोय. (फेऱ्या) पण हा दाबके स्वस्थ बसणार नाही.

पेठे : तो फेऱ्या मारणार....(टाळीसाठी हात पुढं करतात. हसतात.)

दाबके : मिस्टर पेठे – (इतक्यात काळ्या येतो. दाबके घाबरून खोली! बाहेर जातात........)

आक्का : (पेठ्यांना) पेठेसाहेब, चला आता.

पेठे : मालक, एकदा गरीबाकडं जेवायला यायचं तेवढं........

मी : बघू.

पेठे : नाही, होम डिपार्टमेंटला नक्की उत्तर हवंय म्हणून....(प्रभाकर येतो.) आता गेल्यागेल्या होम डिपार्टमेंट विचारणार, मालकांना जेवणाचं आमंत्रण दिलंत ना? ते नक्की येणार आहेत ना?

प्रभा : (दारातून) मी पाठवीन त्याला वकीलसाहेब. तुम्ही फक्त दिवस ठरवा. (आक्कांना पाहून) अरेच्च्या! तुम्हाला पाहिलंच नाही मी. (काळ्या आवाज करतो.) वा! काळोजी, तुम्ही तर आज अगदी चित्रपटातल्या हीरोसारखे दिसताहात. नवीन सदरा....

पेठे : आमच्या होम डिपार्टमेंटनं प्रेझेंट दिलंय त्याला. मालक, त्यांचा काळ्यावर लोभ जडलाय आता. खायला करून काय देतात, कपडे काय देतात –

आक्का : (पेठ्यांना) चला आता. ह्यांचा अभ्यास व्हायचा असेल.

मी : हो....हो ना....

[पेठे, आक्का जातात.]

सुटलो बुवा!

प्रभा : आं? काही तरी गडबड दिसतेय गड्या.

मी : गडबडीचं तंत्र तुझ्याकडं!

प्रभा : लेको, आम्हाला गडबड करायची आहे तर संधी मिळत नाही.

तुम्हाला संधी आहे तर तुम्ही गडबड करत नाही. केलीत तर सांगत नाही. चला, आज सांगून टाका – ती सुंदरी आणि तुम्ही यांची सुरस आणि चमत्कारिक गोष्ट! एका नीरव मध्यरात्री सगळीकडं सामसूम असताना आमचा नायक आणि....

मी : पुरे! काय तुझं नेहमीनेहमी –

प्रभा : अरे तिच्याजवळ जे सौंदर्य आहे ना, ते बोलायला लावतंय. मी म्हणतो, या पपैया थिअरीनं लग्न करायला नको होतं बघ. ज्या गावाला जाता येत नाही, त्या गावची वाट धरावीच कशाला त्यानं? त्यानं ती वाट धरली, आणि तुझ्यावर जबाबदारी पडली. अरे, तुझ्या कर्मकठोर शास्त्रातच सांगितलंय, पती जेव्हा बैरागी बनला असेल, त्याचं पौरुष जेव्हा....

मी : इनफ् आय से. आय ॲम नॉट ॲट ऑल इंटरेस्टेड. त्या बाईचा आणि माझा काहीही संबंध नाही.

प्रभा : काळोजी, तुम्हाला तरी हे पटतंय? (काळोजी नुसताच बघतो. शर्ट उगाचच सारखा करतो.) सदरा बाकी झकास आहे तुमचा. मालकीण-बाईंनी प्रेझेंट दिलाय ना?....काय रंग आहे....आणि हा खिसा पोस्टाच्या पेटीच्या रंगाचा. (खिशात हात घालतो. चिठी मिळते. ती काढतो. वाचतो.) वाहवा! संबंध नाही, पण चिठ्ठ्यांची देवाणघेवाण....केवढी रसिक आहे ही मदालसा! वेड्याच्या खिशातून आपल्या वेडाचा संदेश....

[ दरम्यान 'मी' प्रभाच्या हातून चिठी घेतो. वाचतो. ]

प्रभा : बाईचं अक्षर बाकी मोत्यासारखं आहे. 'भेटण्याची फार इच्छा आहे. केव्हा भेटता?'

मी : तू वाचलीस चिठ्ठी?

प्रभा : ध्या. फक्त अंदाज! तसंच आहे की काय त्या चिठ्ठीत?

मी : न....नाही.

प्रभा : मग बघू? ('मी' चिठी देत नाही.) व्हेरी गुड....संबंध नाही, पण प्रगतिपथावर पावलं आहेत. महाराज, चला....आता वेळ दवडू नका. (टेबलावरचा कागद घेतो) त्वरित उत्तर जायला हवं. (कागदावर लिहितो.) प्रिय....प्रिय....काय, नाव काय लिहू?

मी : मला नावदेखील ठाऊक नाहीय तिचं....खरंच!

प्रभा : ठीक आहे. प्रिय मारी वालावास्का.... (मी मध्येच 'वाल्यूस्का' अशी दुरुस्ती करतो.) मलाही तुला भेटण्याची फार फार फार फार....

मी : पुरे!

प्रभा : ठीक. चारदा फार पुरे. भेटण्याची चारदा फार उत्सुकता आहे.

तथापि माझ्यावरील भारतीय संस्कार सारखे आड येत आहेत. आड....हं, इकडं आड आणि तिकडं विहीर अशा पेचात सापडलेला, सर्वस्वी तुझाच — नेपोलियनशास्त्री बोनापार्ट.

मी : ( चिठी फाडतो. ) प्रभाकर, सांगतो ते ऐक, यापुढं जीव गेला तरी मी पेठ्यांकडं पाऊल टाकणार नाही. त्यांचं छप्पर गळू दे नाही तर घरात चिखल होऊ दे. आय मस्ट स्टॉप इट हिअर अँड हिअर ओन्ली. यापुढं पेठ्यांकडं जाणं नाही....कधीच जाणं नाही.

[ काळोख ]

## दृश्य सहावे

[ मागील दृश्यानंतर चारपाच दिवसांनी. पेठ्यांची खोली. आतल्या दाराशी कुसुम ओचेपदर आवरून उभी. अंगावर पाणी पडलेलं. पेठे 'मी' चा हात धरून आत शिरत आहेत. ]

पेठे : नाही....नाही. ते काही नाही. आज तुम्ही पुढं आणि आम्ही मागं. घराचं व्हेनिस झालंय व्हेनिस.

मी : अहो पण....पेठे....

पेठे : आता होम डिपार्टमेंटलाच सांगतो तुम्हाला धरून ठेवायला....अहो —

[ कुसुम क्षणभर बघते. आत जाते. 'मी' आणि पेठे पुढं होतात. पलीकडून दाबक्यांचं घोगऱ्या आवाजात गाणं सुरू होतं. यमुना जळि खेळू खेळ....]

पेठे : ऐकलंत ? रेडा वेद म्हणायला लागलाय !

मी : पावसाचं पाणी कुठून येतं तेवढं फक्त मला सांगा.

कुसुम : मी सांगते. ( पेठ्यांकडं बघते. पेठे अंगात काळा कोट चढवतात. )

पेठे : कोर्टात फार महत्त्वाची केस आहे. आम्हाला पळालं पाहिजे. मालक, घर तुमचंच आहे समजा.

[ पेठे बाहेर पाऊल टाकतात. 'मी' त्यांच्याबरोबर जाणार एवढ्यात कुसुम आतल्या दाराआडून 'मी' चा हात धरून ठेवते. ]

मी : अहो पण....अहो पेठे....

पेठे : (बाहेरून) आता कोर्टात भेटा. (जातात.) (कुसुम दार बंद करते.)

मी : (कुसुमला) तुम्ही हे काय चालवलंय ? (कुसुम कडी लावते. दाराला कुलूप लावते.) कृपा करून ते दार उघडा. तुम्ही अशा भर दिवसा....जरा काळवेळाचं भान ठेवा. शेजारी दाबके आहेत....

कुसुम : माझ्या शेजारी फक्त तुम्ही आहात एवढंच माहीत आहे मला !

मी : याचा परिणाम काय होईल याचा विचार केलाय ?

कुसुम : आता मला कसलाच विचार करायचा नाहीय....

मी : तुमच्या मनात तरी काय आहे ?

कुसुम : सांगू ? आपण पळून जाऊ या. दूर कुठं तरी. जिथं माझ्यावर फक्त तुमचा हक्क असेल. तिथं मग तुम्ही आणि मी, आणि आपला संसार.... मला पूर्ण संसार हवाय हो.

मी : काय बोलताय काय तुम्ही ? शुद्धीवर आहात ना ?

कुसुम : या क्षणी तरी शुद्धीवर राहायची इच्छा नाहीय मला.

मी : अहो, पण दाबके पाहातील...सगळ्या वाड्याला आग लागेल.

कुसुम : शक्य आहे. मी दार बंद केलं तेव्हाच मला हे सारं ठाऊक होतं.

मी : सत्यानाश करून घ्यायचाय का आपला ?

कुसुम : माझा सत्यानाश तर केव्हाच झालाय. आता झालं काही तरी बरंच होईल.

मी : दार उघडा. मला जाऊ द्या. (कुसुम मानेनं नाही म्हणते.) आयुष्यातून उठायचंय तुम्हाला ?

कुसुम : आयुष्यातून मी उठल्यासारखीच आहे.

मी : कुलूप काढा आधी.

कुसुम : तुम्हाला चिठ्ठी पाठवली. तुमचं उत्तर नाही. तुमच्यापाशी मन मोकळं करावं, तुम्हाला सर्व काही मनातलं सांगावं म्हणून तडफडतेय मी. बोलायला संधीच मिळत नाही म्हणून त्या रात्री दिंडीदरवाजापाशी तुमची वाट पाहात थांबले. पण तिथंही धड बोलता आलं नाही. आज मी तुम्हाला जाऊ देणार नाही. माझं सर्व काही ऐकून घेतलंच पाहिजे तुम्हाला. मला जगात काहीच नसावं का ? मीही माणूस आहे. मलाही मन, भावना आहेत. मला पूर्ण आयुष्य, पूर्ण संसार हवाय. मनोमनी मी केवळ तुम्हालाच वरलं आहे. माझ्यासारखी एक चांगल्या संस्कारांची मुलगी अकारण कधी वागेल अशी ?

मी : नाही. आणि ती चांगल्या संस्कारांच्या माणसाकडून अशी अपेक्षाही करणार नाही अकारण.

कुसुम : अगदी खरं! माझ्या पतीकडून मला सुख मिळालं असतं तर मी माझ्या संसारातच रमले असते. परपुरुषाचा विचार माझ्या मनातसुद्धा आला नसता. फक्त शरीरसुखाची भूकच भागवायची असती तर मला काय ते शक्य नव्हतं? पण माझ्या संस्कारांनी मला आवडनिवड दिलीय. मी तुम्हाला प्रथम पाहिलं आणि माझ्या मनानं संस्कारांविरुद्ध बंड पुकारलं.

मी : हे पाहा पेठेबाई....

कुसुम : कुसुम. तुम्ही मला कुसुमच म्हणा. एकेरी नावानं.

मी : ते दार उघडा. (कुसुम तशीच उभी) कुसुम, कुलूप काढ.

[ कुसुम कुलूप काढते. 'मी' दाराजवळ जातो, एवढ्यात.... ]

कुसुम : त्या हरामखोरानं बाहेर माणसं जमवली असतील. काय सांगाल त्यांना? सांगाल, या बाईचाच दोष आहे? हिनंच मला आत अडकवलं? ही वाईट चालीची आहे?

मी : नाही....तसं मी काहीएक सांगणार नाही.

[ कडी काढतो. ]

कुसुम : ठीक आहे. तुम्हाला थांबवण्याचा मला काय अधिकार आहे? तुमच्यावर जबरदस्ती करणारी मी कोण? मी फक्त आयुष्यभर केवळ जबरदस्तीच स्वीकारणारी. माझ्या इच्छेविरुद्ध माझं लग्न लावण्यात आलं, जबरदस्तीनं हा अळणी संसार माझ्यावर लादण्यात आला, इथं या परिस्थितीत जगत आले जबरदस्तीनंच. तुम्ही भेटलात आणि आयुष्यातली जबरदस्ती विसरून मनाला नकळत कोवळी पालवी फुटली. कधी नाही ते जगावंसं वाटू लागलं. पण आता तेसुद्धा माझ्या नशीबी दिसत नाहीय.

[ चेहरा झाकून रडू लागते. ]

मी : (तिच्या चेहऱ्यावरील तिचे हात काढतो.) तुझं दुःख मी समजू शकतो कुसुम. पण ते दूर करण्याचा अधिकार....

[ कुसुम 'मी' चे हात घट्ट धरते. आपल्या चेहऱ्याजवळ आणते. एवढ्यात दार लोटून आक्का व काळ्या दारात येतात.... ]

[ अंक पहिला समाप्त ]

# अंक दुसरा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ..९५५०७.. नों. दि ..............
वि. ...आरक....... क्र. २९/७/६३..

## दृश्य पहिले

[ वाड्याचं दृश्य ]

[ वेळ दुपारची ]

[ पेठ्यांच्या खोलीत फोनोवर जुन्या नाटकातलं गाणं. 'नरवर कृष्णासमान' चाललेलं. त्या खोलीसमोर बसलेल्या काळ्याचं खाणं आटोपलेलं आहे. कुसुम इकडंतिकडं पाहून त्याच्या खिशात चिठ्ठी ठेवताना दिसते. ]

कुसुम : खाणं झालं ना ? आता जा. ( काळ्याला कळत नाही ) जा ना....

[ हातानं त्याला धरून जायला खुणावते. काळ्या जाऊन जिन्यात बसतो. कुसुम आत जाऊन खलबत्ता, पोतं, पिशवी ( पिशवीत शिकेकाई आणि संत्र्यांच्या साली ) घेऊन बाहेर येते. पोतं टाकून त्यावर खल ठेवते. ओट्यावर बसून शिकेकाई कुटू लागते. ]

आक्का : ( आतून ) पेठेबाई – ( कुसुम गप्प ) अहो पेठेबाई —

कुसुम : अं हं ! मी ओ देणारच नाही.

आक्का : ( बाहेर येत ) विसरलेच हो....कुसुमताई – ( दोघी हसतात. आक्का तिच्याशेजारी बसतात. ) आता दुपारी बघा मला कामच उरलेलं नाहीय. तुम्ही माझं सगळं निवडण करून ठेवता —

कुसुम : त्याला काय झालं केलं म्हणून ? शेजारधर्मच आहे. तुम्ही नाही का मला तुमचा फोनो देऊन ठेवलाय ?

आक्का : सासरच्यांनी तो फोनोच तेवढा नेऊ दिला. तिथं नाही तरी कुणाला आवड होती ? अडगळच होत होती त्यांना....तीच तीच गाणी ऐकून माझे कान किटले. पडला होता तसाच. दिला तुम्हाला.

[ कुसुम आत जाते. फोनो बंद करून बाहेर येते. ]

आक्का : शिकेकाई कुटायला बाहेरशी घेतलीत ?

कुसुम : आत नवीन फरशी बसवलीय ना मालकांनी !
आक्का : एवढी शिकेकाई कशाला लागणार आहे तुम्हाला ?
कुसुम : अं ? नाही....पण कुटायचीच आहे तर....वाटलं तर कुणाला द्यायला होईल. ( कुटू लागते )
आक्का : कुणाला तरी द्यायंची, तर मला द्याल का ?
कुसुम : अं ? हो....हो. देईन की.
आक्का : आणि हे काय ?
कुसुम : संत्र्याच्या साली आहेत वाळवलेल्या. त्यासुद्धा कुटून टाकते मी शिकेकाईत. कसा छान सोनेरी रंग येतो पावडरला, आणि संत्र्याचा गोड वाससुद्धा येतो.
आक्का : नाही तर तुमच्या आधी होत्याच की त्या अवधानीणबाई. गलथानपणात त्यांचा हात कुणी धरला नसता. आता कशी ? तुम्ही इथं छान रांगोळी घालता. नेटका संसार करावा तर तुमच्यासारखा ! पण म्हणतात ना –
[ ती एकदम गंभीर झालेली पाहून गप्प होतात. काळ्याकडं पाहातात. मग ]
आक्का : काळोजी, कुसुमताईचं अन्न खाऊन तू आता टुकटुकीत व्हायला लागला आहेस हो ! ( कुसुमला ) जरा अक्कल आली तर उद्या आमच्या शाळेत हेडमास्तर होऊन जाईल हा काळोजी ! ( कुसुम काहीच प्रतिसाद देत नाही. ) बोलत नाही आहात ? रागावलात ?
कुसुम : कुणावर आणि कशाबद्दल रागवायचं ? नशीबावर रागावलं तरी ते चालतं होत नाही कपाळावरून ! ( जोरात कुटते ) कुंकवानं ठोकून ठेवलंय ना त्याला कपाळी !
[ काळोजी वर जाऊ लागतो. ]
आक्का : वर कुठं जाताय, काळोजी ? तुमच्या मालकांचा पत्ता कुठाय आठदहा दिवस ?
कुसुम : आठदहा दिवस कशानं ? चांगले.... ( चपापते ) नाही, त्यांना सांगायचं होतं, दुरुस्त्या करून दिल्याबद्दल.... ( कुटू लागते. )
आक्का : कुसुमताई, त्या दिवशी तुम्हाला मी बजावलं होतं. तुम्ही मला शब्दसुद्धा दिला होता. मोठ्या मालकांनी मला इथं का आणि कशासाठी नेमलंय, माहीत आहे ना तुम्हाला ? माझं बारीक लक्ष असतं सगळ्यांच्यावर. माझ्या कानावर ज्या गोष्टी येताहेत –
कुसुम : कल्पना आहे मला. आमचे शेजारी काय वाटेल ते सांगत असतील.
आक्का : ते कसे आहेत ते मला चांगलं ठाऊक आहे....त्या रात्री मालकांना

दिंडीदरवाजा उघडायला कोण गेलं होतं ? तुमच्या घरी मी आले तेव्हा काय पाहिलं मी ? आहे उत्तर तुमच्याजवळ ?

कुसुम : मी....मी चुकतेय आक्का. मला समजतंय, पण माझं मन माझ्या ताब्यात राहात नाहीय हो.

आक्का : राहिलं पाहिजे. बाराव्या वर्षी कपाळीचं कुंकू गेलं माझ्या. माहेरी तुकडे मोडत शिकले. मास्तरणीची चाकरी केली. पार पेन्शनीत निघेपावेतर. काय मिळालं मला आयुष्यात ? एकटी जन्माला आले. जाणार तीसुद्धा एकटी. असतील भोग नशीबात, ते भोगायलाच लागतात. पण ते भोगत असताना काळजी घ्यावी लागते, त्यांची झळ दुसऱ्यांना लागणार नाही त्याची.

कुसुम : पटतंय् मला आक्का, पण...पण माझं सगळं आयुष्य अजून जायचंय् हो.

आक्का : हे पाहा, पुन्हा मला असं काही आढळता कामा नये. बस, एवढंच सांगते. ( कुसुमला हुंदका फुटतो ) कुसुमताई, मोठ्या वहिणीला धाकटीवर कधीकधी कठोर व्हावं लागतं हो, तिच्या भल्यासाठी.

कुसुम : ( डोळे कोरडे करत ) तुमचा हेतू समजतोय् मला — यापुढं मी मनावर दगड ठेवीन.

[ दाबके आपल्या खोलीतून बाहेर येतात. ते कुसुमकडं बघतात आक्कांचं त्यांच्याकडं लक्ष जातं. ]

दाबके : काय आक्का — ( कुसुम लगबगीनं आवराआवर करू लागते. )

आक्का : तुम्ही आत्ता घरी कसे ? आज हापीस नाही ?

दाबके : नाही. सकाळी डोकं जरा दुखत होतं, राहिलो घरी. ( वास घेत ) संत्र्यांची करंडी आलेली दिसतेय् जवळपास.

आक्का : अं हं. संत्र्यांच्या सालीचा वास आहे. ह्या दिवसात कुठली आलीयत संत्री ?

दाबके : येतीलदेखील. दिवस बदलले आहेत आजकाल आक्का. आक्का, या चारआठ दिवसात मालक दिसले का तुम्हाला ? त्यांना सांगायचं होतं, आमच्याही घराकडं जरा कृपादृष्टी वळवा. भिंतीचा गिलावा सुटला आहे, एकदोन कौलं जराशी — म्हणजे होतं असं, आम्ही वेळेवर भाडं देतो ते ते खर्च करतात भाडं थकवणाऱ्या बिऱ्हाडकरूंवर.

[ कुसुम रागानं सामान आवरून आत जाते. ]

दाबके : ( पाठमोऱ्या कुसुमकडं बघत ) आणि त्या दिवशीच्या प्रकाराबद्दलही विचारायचं आहे त्यांना. पण गेले दोन आठवडं तोंड दाखवताहेत कुठं ?

आक्का : राहिले असतील नेहमीप्रमाणं मित्राकडं अभ्यासाला. एकटा जीव –
दाबके : म्हणूनच हे प्रकार चालले आहेत. भर दिवसा, दारं लावून –
आक्का : दाबके !
दाबके : आमच्या खोलीतून मी स्वतः पाहात होतो.
आक्का : तर ! भिंती काचेच्याच आहेत ना तुमच्या !....दाबके, मालकां-बरोबर मी स्वतः आत गेले होते पेठ्यांच्या घरात.
दाबके : तुम्ही ? पण तुमचा आवाज तर —
आक्का : का ? मी काय आमच्या शाळेतल्या कविता मोठ्यानं म्हणायला हव्या होत्या ?
दाबके : दार बंद केल्याचा चांगला आवाज ऐकला मी. त्याच वेळी सोक्षमोक्ष लावणार होतो. पण तेवढ्यात हा काळ्या कडमडला मध्ये.
आक्का : दाबके, मी स्वतः दार बंद करून मालकांना दाराशी कुठं गळतंय ते दाखवत होते — आणि दुसऱ्याच्या घरावर लक्ष ठेवण्यापेक्षा स्वतःच्या घरात जरा लक्ष घाला. दाबकेकाकूंचं अंथरूण अजून सुटत नाहीय आणि तुमचा सदाशिव, तो शाळकरी पोरगा, चोरून विड्या ओढतो.
दाबके : विड्या ? शक्यच नाही.
आक्का : मी नेहमी खरं तेच बोलते. त्याचं आधी दप्तर आणि खिसे तपासा आणि मग मला सांगा तो विड्या ओढतो की नाही ते.
दाबके : आता येऊन दे सद्याला शाळेतून, नाही त्याची हाडं मोकळी केली तर विचारा ! हॅः ! आपला सगळा वाडाच बिघडत चाललाय्. हे शेजारी आल्यापासून.... आक्का, तुम्हीसुद्धा शेजाऱ्यांवर लक्ष ठेवा हो. माकडाला मोत्यांची माळ मिळालीय —
आक्का : हो नं. मग दुसऱ्या माकडांना वाटतं, ती माळ आपल्या गळ्यात घालावी. ( एवढ्यात ‘ मी ’ आणि प्रभाकर येतात ) मालक, ह्या दाबक्यांनी नाव काढायला आणि तुम्ही यायला, एकच गाठ पडली.
मी : कशासाठी माझं नाव निघालं होतं ?
आक्का : ( दाबक्यांना ) सांगा ना.
दाबके : नाव म्हणजे हेच.... आपला हल्ली काही ठावठिकाणा नाही. ( ‘ मी ’ चा आवाज ऐकून कुसुम दारात येते ) अभ्यास जोरात चाललेला दिसतोय्. काय म्हणतोय् अभ्यास ?
मी : अच्छा, म्हणजे तुम्ही माझ्या अभ्यासाच्या चौकशीसाठी वाट पाहात होता !
प्रभा : अरे बरोबरच आहे. लॉच्या अभ्यासाची चौकशी करायला तेवढ्याच

तोलामोलाचा माणूस हवा!

मी : हो ना. दाबके, आपलं शिक्षण?

दाबके : मॅट्रिकपर्यंत.

मी : पर्यंत म्हणजे नापासच! (कुसुम हसते) दाबके, माझा अभ्यास चांगला चाललाय्. काळजी करू नका. चल प्रभाकर.

दाबके : (दारात कुसुम हसतेय् ते बघून, चिडून) मालक, अभ्यासाचं मला नकोय्. आमच्या घरातल्या दुरुस्तीचं काय? दुसऱ्यांच्या दुरुस्त्या लगेच होतात.

मी : दुसऱ्यांच्या घरात तुम्ही फार डोकावताय्सं दिसतं — मला सवड होईल तेव्हा तुमच्या दुरुस्तीचं.... म्हणजे तुमच्या घरातल्या दुरुस्तीचंसुद्धा पाहून घेईन मी. पावसाळा संपलाच आहे –

दाबके : तरीसुद्धा मध्येच आला पाऊस – वरची काही कौलं फुटली आहेत.

मी : आता सांगूच का? तुमच्या मुलाकडून– सदाशिवकडून तुम्ही ती मुद्दाम फोडून घेतली आहेत. आता स्वतःच्याच पैशानं कौलं आणा आणि स्वतःच्याच पोराकडून ती टाकून घ्या.

दाबके : मालक, उगाच भलते आरोप करू नका हं!

मी : झालेली गोष्ट लक्षात नसेल, तर सदाशिवला पुन्हा विचारून घ्या. चल प्रभाकर — ('मी' आणि प्रभाकर जिन्याकडं वळतात.)

दाबके : आक्का, ही चहाडी तुम्ही केलेली दिसतेय्.

आक्का : म्हणजे? मालक म्हणाले ते खरं की काय?

[कुसुम हसते. दाबके रागारागानं आपल्या खोलीकडं वळतात.]

आक्का : कुसुमताई, मी जरा बाहेर जाऊन येते. खोलीकडं लक्ष ठेवाल ना?

[बाहेर जातात.]

[कुसुम आक्कांच्या खोलीकडं बघते. काही तरी विचार करते आणि आपल्या खोलीत निघून जाते. – काळोख]

## दृश्य दुसरे

['मी'ची खोली. स्वच्छ, आवरलेली. फर्निचरच्या जागा बदललेल्या. टेबलवर टेबलक्लॉथ. फुलदाणी. त्यात फुलं. रूप खूपच पालटलेलं. दार

उघडून 'मी' आणि प्रभाकर आत येतो. 'मी' स्वच्छता पाहून चकित. ]

प्रभा : तू तर म्हणत होतास खोलीत दोन आठवड्यांचा कचरा पडला असेल !

मी : मला वाटतं, आमच्या जिजाबाईंचा काल हात फिरलाय इथं.

प्रभा : मोठी चलाख दिसतेय ही जिजा मोलकरीण ! आणि गुणी किती ! हा टेबलक्लॉथ बघ – तिनं स्वतः विणलेला. ही गुलाबाची फुलं....दोस्ता, माझी कल्पना आहे, मिसेस् पेठे या वाड्यात आल्यापासून इथला प्रत्येक जीव मोठा रसिक झालाय्. उदाहरणार्थ, दावके ! त्याच्या अंगावर चक्क पांढरा स्वच्छ गंजीफ्रॉक ! नाही तर काय कळकट असायचा रे तो ! नंतर तू. नाही, तू पहिल्यापासूनच रसिक आहेस. झालंच तर ही तुमची जिजा मोलकरीण. डोळ्यांनी तिला धड दिसत नाही, तरीसुद्धा असा सुंदर टेबलक्लॉथ विणतेय्.... (सगळीकडं बघतो) वाः ! लेकिन एक डाउट आहे गड्या. तू इथं नसताना तुमच्या जिजाबाई या महालात शिरल्या कशा ?

मी : आक्कांजवळ दुसरी किल्ली असते ती घेतली असेल जिजाबाईनं.

प्रभा : ओ. के. डाउट रूल्ड आउट. रसिकराज, तू एकादा मुसलमान बादशहाच व्हायचास. पण काही गोष्टीत फुकट आहेस. मदिरा आणि मदिराक्षी. मदिरा तुला वर्ज्य, कारण तू उच्च कुलोत्पन्न हिंदू संस्कार घेतलेला तरुण. मदिराक्षी.... रविवर्म्याच्या चित्रातल्या सुंदरीसारखी. नजरेत प्रियकराच्या प्रतीक्षेची अधीरता....

मी : स्त्रियांची वर्णनं करायला लागलास की तुला किती बोलू आणि किती नको असं होतं. एका तरी स्त्रीचं तू दोन शब्दात कधी वर्णन केलं आहेस ?

प्रभा : आता करतो. दोनच शब्द. मिसेस् पेठे.

मी : प्रभाकर —

प्रभा : मतलब्, काहीतरी हल्ली शिजतंय् ! तर मित्रा, आपल्या जीवश्चकंठश्च मित्रापासून आपल्या कंठश्चजीवश्च मैत्रिणीबद्दल काहीही चोरून ठेवू नये ! आता बोल बघू, प्रगती कुठवर आलीय ? नाव कळलं ?

मी : नाही.

प्रभा : नाही ? अरे पण परवा तर तू मला तिचं नाव सांगितलंस सुमन म्हणून ?

मी : सुमन नाही, विमल.

प्रभा : सापडलास की नाही ?

मी : नाही. तिचं नाव विमल नाहीच.

प्रभा : आँ ? लेकिन, ज्याला सुंदरीचं नाव विमल नाही हे माहीत आहे, त्याला तिचं खरं नाव माहीत असणारच. गुड. नाव कळलं. आता ओळख झालीच असणार. त्याशिवाय का ती मघाशी तुझ्याकडं तशा नजरेनं बघत होती ? हसण्याची–बोलण्याची, नंतर स्पर्शांची देवाणघेवाण. ( 'मी ' गप्प ) मौनसंमति लक्षणम् !

मी : प्रभाकर, माझं लग्न ठरलंय् .

प्रभा : अफसोस ! नाही तर ही प्रगती अशी वेगात झाली असती ? असो ! तर तुझं लग्न ठरलंय हे विसरून आणि लग्न झालेलं नाही हे लक्षात ठेवून.... अं हं ! मी ओळखलंय्, तुझ्या मनात सध्या द्वंद्व चालू आहे. तुझ्यावरले हिंदू संस्कार विरुद्ध तारुण्यसुलभ मोह.

मी : प्रभाकर, दुसऱ्याच्या पत्नीबद्दल असं बोलणं तुला शोभत नाही.

प्रभा : थांब. त्या पत्नीचा पती पपैया थिअरीसारखा असेल तर तिला पत्नी का म्हणावं ? एक सुंदर, तरुण कुमारिका एवढंच वर्णन बस्स ! शहाण्या, तिच्या तारुण्याला लागलेली भूक तिच्या नवऱ्याकडून कधीही भागवली जाणार नाहीय हे ध्यानात घे, आणि –

मी : तुला इथं आल्यावर कुसुमबद्दल बोलल्याशिवाय चैनच पडत नाही का ?

प्रभा : ओह् ! द कॅट ईज आउट ऑफ द बॅग ! कुसुम....नाव कळलंय् , आता दिरंगाई नको. पहिलं खरंखुरं प्रेमपत्र तिच्याकडं जाऊ दे. ( कपाटातून अत्तराची छोटी लाकडी पेटी काढतो. उघडतो. ) यातल्या तीन अत्तरांपैकी एक अत्तर त्या पत्राला लाव.

मी : तीन ? ( पेटी घेतो. बघतो. ) यातलं फान्झ कुठंय् ?

प्रभा : फान्झ....याने मृतिका गंध ! दोस्ता, तुझ्या मनातले भाव कळवायला हा मृत्तिकागंध त्या रूपगर्वितेकडं आधीच तर गेला नसावा ना ? की त्या प्रेमिकेनं अत्तराच्या कुपीची चोरी केलीय ? क्वाइट् पॉसिबल ! अत्तराची चोरी फक्त प्रेमिकच करतात.

मी : अरे पण हे फान्झ इथं नागपुरात कुठंही मिळत नाही. ते मी खास कनौजहून मागवलं होतं. ( पेटी कपाटात ठेवतो. )

प्रभा : उत्तम ! म्हणजे वासावरून तुला चोर लगेच धरता येईल. आणि रसिक चोराला धरणं – हाउ व्हेरी रोमँटिक ! गंधित आलिंगन....

मी : प्रभाकर, खरं सांगू ? कॉलेज सुटल्यावर तू माझ्याबरोबर इथं येतोस, हरकत नाही, माझाही थोडासा वेळ चांगला जातो – पण हल्ली तू मिसेस् पेठ्यांबद्दल सारखा बोलत असतोस ना, ते मला आवडत नाही. मनापासून आवडत नाही. तुझी आणि माझी विचारसरणी अगदी भिन्न आहे.

आपली मैत्री तुला टिकवायची असेल तर हा विषय ताबडतोब बंद झाला पाहिजे.

प्रभा : मित्रा, खरं सांगू ? मी तुझ्याबरोबर इथं येतो तो तुझा वेळ घालवायला नाही, माझा वेळ घालवायला. वर येताना नशीब असलं तर तिचं दर्शन घडतं. तिच्याबद्दल बोलायला लागलो की अशी मजा वाटते —

मी : असं ? मग ऊठ आधी. ही मजा करण्याची जागा नाही. ही फक्त अभ्यासाची जागा आहे. ( त्याला उठवतो. )

प्रभा : अरे पण – बरं, डोक्यात एक चावट कल्पना आलीय् तेवढी सांगतो आणि जातो. अर्थात् तिच्यासंबंधीच आहे. लास्ट वन्.

मी : नो ! तू आता ह्या क्षणीच बाहेर जावंस हे चांगलं. नाही तर....नाही तर आपली ही भेट शेवटची ठरेल.... ( दाराशी नेत ) प्लीज, प्रभाकर....

[ त्याला बाहेर काढतो....दार लावतो.

' मी ' दाराला कडी लावतो. टॉवेल, साबण घेऊन आत जातो. काही क्षणांनी —

भिंतीलगतचं जुनं कपाट सरकवलं जातं. कुसुम त्या कपाटामागून आत येते. ती कपाट जागच्या जागी सरकवते. सगळीकडं बघते. तिच्या हातात ' मी ' चा रुमाल आणि पिवळ्या गुलाबाचं टपोरं फूल आहे. ती कॉटवर ' मी ' नं टाकलेला कोट उचलते. कोटाला ते फूल लावून कोट खुर्चीच्या पाठीवर व्यवस्थित ठेवते. मग ती खुर्ची मध्ये ठेवते. खोलीची आवराआवर करते. ' मी ' चा शर्ट बाजूला धुण्यासाठी काढून ठेवते. पुस्तकं नीट लावते. कोपऱ्यातले ' मी ' चे बूट पुसून नीट ठेवते. इतक्यात बाजूच्या बाथरूमच्या खोलीतून ' मी ' ची चाहूल येते. कुसुम पटकन् कपाटाच्या आड लपते. ' मी ' तोंड पुसत गुणगुणत आत येतो. आत येताच त्याला वास येतो. तो काहीसा दचकतो. स्वतःशीच ' फान्झ ! ' असं म्हणतो. मघाशी पलंगावर टाकलेला कोट त्याला दिसत नाही. तो खुर्चीवर दिसतो. कोटाला फूल लावलेलं दिसतं. तो गोंधळतो. मग दाराकडं बघतो. कडी लावलेली दिसते. खुर्चीवर विचार करत बसतो. कपाटामागून कुसुम हळूच येते. त्याचे डोळे झाकते. ' मी ' ताडकन् उठतो. ]

मी : तुम्ही ? इथं कशा आलात ?

कुसुम : आपल्या पायांनी, चालत ! ( हसते )

मी : हे पाहा, माझ्या पायांनी आला नाहीत हे ठाऊक आहे मला. तुमचं माझ्याकडं काय काम आहे ?

कुसुम : काम म्हणजे....हो, तुम्हाला भेटायला.

मी : इथं?

कुसुम : मग दुसरीकडं कुठं भेटायचं तुम्हाला?

मी : पण या वेळी —

कुसुम : ही काय मध्यरात्र आहे? चांगली दुपारची वेळ आहे.

मी : (गोंधळलेला) हसताय् काय? आक्का कुठं आहेत?

कुसुम : अजून आल्या नाहीत.

मी : म्हणजे तुम्ही त्यांच्या घरातून आतल्या जिन्यानं इथं आलात. अहो, तो जिना वापरात नाहीय.

कुसुम : म्हणूनच मी वापरला.

मी : तुम्हाला कुणी पाहिलं इथं येताना?

कुसुम : आपण कशाला पाहावं कुणी पाहाताय् की नाही ते? नाही का? तुम्ही असंच करता माझ्या समोरून जाताना....आज चौदा दिवस झाले. मी रोज वाट पाहायची. अगदी इथपर्यंत येऊन वाट पाहिली.

मी : म्हणजे ह्या जिन्यानं यायचा प्रकार –

कुसुम : झाले असतील दोनचार दिवस. पहिल्यांदा हे कपाट सरकवताना जरा त्रास झाला.

मी : पण.... (सगळीकडं बघतो) हे सगळं तुमचंच काम ना?

कुसुम : (हसत) अं? हो. म्हटलं घरचंच कार्य आहे....आवराआवर पसंत आहे ना? — हो, धुवायचे कपडे टाकायला किनई, उभी बास्केट मिळते ती आणू या का आपण?

मी : आपण?

कुसुम : (हसते) हूं! ही खोली मला दुसऱ्याची वाटतच नाही! खरंच!

मी : पण मी खोलीत नसताना तुम्ही का आलात इथं?

कुसुम : म्हणजे तुम्ही खोलीत असताना यायला हरकत नाही असंच ना?

मी : नसताना यायला जास्त हरकत आहे!

कुसुम : पण तुम्ही खोलीत आहात की नाही हे पाहायला आले तर? किंवा ही खोली स्वच्छ करायला म्हणून आले तर?

मी : स्वच्छ? तुम्हाला इथं स्वच्छ चोरी करायची असते!

कुसुम : मी कपाटातली अत्तराची बाटली नेली तेच ना? काय सुरेख वास आहे हो! काय म्हणतात हो या अत्तराला? — सांगा ना. आता मी तेच लावून आलेय. (त्याच्या नाकाशी हात नेते.)

मी : (तिचा हात दूर करत) फान्झ ! — बाई, तुमचं हे जे काय चाललंय ना.... इथं चोरून येणं –

कुसुम : एक. (बोटानं मोजू लागते.)

मी : इथली आवराआवर करणं –

कुसुम : दोन.

मी : इथं फुलं आणून ठेवणं —

कुसुम : तीन. (हसते. 'मी' ला पुढं सुचत नाही, तेव्हा) आणि त्या दिवशी तुमचा आमच्याकडं राहिलेला रुमाल स्वच्छ धुऊन आणणं, चार. ('मी' चा रुमाल पुढं धरते) ध्या नं. (हसते.)

मी : (तिच्या हातातून रुमाल घेत) तुम्हाला सारखं हसायला काय येतंय ?

कुसुम : मला खूप खूप आनंद झालाय ना ! मी इथं आलेय्, तुम्ही आणि मी बोलतोय्, तुम्ही मला अजून हाकलून दिलेलं नाहीय – (हसते.)

मी : हो, ते राहिलंच.

कुसुम : मला हाकलायचं ?

मी : नाही, सांगायचं ! हे पाहा बाई, तुमचं हे जे काही चाललंय ते....बरं नाहीयं.

कुसुम : मी करते ते साधारण बरं नसतंच.

मी : कुणी पाहिलं तर काय म्हणेल ?

कुसुम : म्हणेल, ही बाई निर्लज्ज आहे, मुलगा मात्र फार चांगला आहे.... मला कशाचंच काही वाटणार नाही.

मी : पण मला वाईट वाटेल !

कुसुम : कशाचं ? तुम्हाला चांगलं म्हटल्याचं की मला निर्लज्ज म्हटल्याचं ?

मी : दोन्ही गोष्टींचं.

कुसुम : मला निर्लज्ज म्हटल्याचंही ? (डोळ्यात पाणी) म्हणजे याचा अर्थ – ('मी' च्या खांद्यावर हात ठेवते. 'मी' दूर होतो.) त्या दिवशी तुम्ही माझ्या खांद्यावर हात ठेवलात, तेव्हा मला काय वाटलं ते – सांगू नको ना ?

मी : नको.

कुसुम : बरं झालं. मला ते नसतंच सांगता आलं. माझ्याकडच्या पिवळ्या गुलाबाला पहिलं फूल आलं, त्याचा झाडाला किती आनंद झाला तो येईल त्याला सांगता ? अं हं ! तशीच. तुमची-माझी पहिली भेट झाली त्याचा मला किती आनंद झाला तो येईल मला सांगता ? त्या दिवसापासून मी सारखी हसते आहे. स्वतःशीच. मनाशीच. रोज वाटायचं, तुम्ही याल, मला दिसाल. माझ्याशी बोलाल. काळोजीजवळ मी रोज चिठ्ठी द्यायची. तुम्ही

आला नाहीत की संध्याकाळी ती काढून घेऊन नवी चिठ्ठी द्यायची. आजसुद्धा मी एक चिठ्ठी दिलीय त्याच्याजवळ.

मी : तुमचं हे वागणं —

कुसुम : त्यात लाज वाटण्यासारखं कधीच काही नसतं. आता मला वाटतं ना, तुमची सेवा करावी, तुमची सगळी लहानसहान कामं करावीत.... हो, मला एकदा तुमच्यासाठी चांगलंचुंगलं जेवण करायचंय. तुम्ही याल का जेवायला ? मी निमंत्रण पाठवीन. तुम्ही हो म्हणायचं. आपण रविवारच धरावा, नाही ? अय्या ! त्या दिवशी दसरापण आहे !

मी : तुम्ही असं काही बोलताय की जसा काय मी होकारच दिलाय !

कुसुम : अर्थातच ! होकार कधी मागायचा नसतो, घ्यायचा असतो. तर मग हे ठरलं. तुम्हाला रीतसर आमंत्रण मिळेल.

मी : कुणाकडून ?

कुसुम : मिळेल मिळायचं त्यांच्याकडून ?

मी : म्हणजे पेठेसाहेबांकडून ?

कुसुम : ( कष्टानं ) हं.

मी : ते बरेच आज्ञेत दिसतात तुमच्या.

कुसुम : असतील नाही तर नसतील.

मी : आज्ञा देण्यासाठी म्हणून जरी तुम्ही त्यांच्याशी बोललात तरी ते स्वतःला धन्य मानत असतील.

कुसुम : असतील नाही तर नसतील.

मी : तुम्ही त्यांच्याशी कधी बोलतच नाही ?

कुसुम : प्लीज, त्यांच्याविषयी बोलू नका....मी म्हणते म्हणून.

मी : तुम्ही लाख म्हणाल, पण मी काही तुमच्या आज्ञेत नाही.

कुसुम : तुम्ही राहूच नये कुणाच्या आज्ञेत. ( खुर्चीत बसते ) आता विचारा काय हवं ते. मी रडावं अशीच देवाची इच्छा असेल तर त्याला तुम्ही तरी काय कराल ? त्या दिवशीच्या तुमच्या स्पर्शानं हसत राहिलेय. आता शब्दांनी रडत ठेवा मला. ( डोळ्यात पाणी ) हं, बोला.

मी : तुम्हाला रडवावं अशी काही माझी इच्छा नव्हती.

कुसुम : देवाचीच होती म्हटलं ना ? हं —

मी : नाही....म्हणजे वास्तविक पाहाता असे प्रश्न विचारण्याचा मला तसा काही अधिकार नाही.

कुसुम : तो मी तुम्हाला दिलाय् समजा....विचारा.

मी : पेठसाहेब हाडाचे तसे निरुपद्रवी असताना, तुम्हाला ते कधी त्रास

देताना दिसत नसताना, तुमच्या आज्ञा मुकाट्यानं पाळत असताना —

कुसुम : मी इथंच का येते, अशी का वागते, असंच ना?

मी : तसं नाही, पण –

कुसुम : नाही कसं? तसंच आहे....आक्कांना मी शब्द दिला होता, तुम्हाला कधी भेटणार नाही. पण पाय नकळत इथंच घेऊन येतात मला. आक्कांना फसवून मी इथं येते. मनासारखा दुसरा शत्रू नसतो ना स्वतःला! (हुंदका देते.) तुम्हाला मी खरीच दोषी वाटत असेल तर.... (आवेगानं उठते, 'मी' चा बूट उचलून आणते) तुमच्या अधिकारात मला हवी ती शिक्षा करा....घ्या नं. आताच मी स्वच्छ करून ठेवलाय् हा.

मी : (दचकून) तुम्ही माझे जोडेसुद्धा पुसून ठेवलेत?

कुसुम : कुणाचे पाय हाती लागत नसतील तर निदान जोडे उचलावेत त्याचे....हं –

मी : (तिच्या हातातला बूट फेकून देत तिचे खांदे धरतो) कुसुम....कुसुम.... (ती रडू लागते. त्याला बिलगते) रडू नकोस कुसुम....कुसुम....कुसुम –

कुसुम : तुम्ही मला नावानं हाक मारलीत. (पुन्हा रडू लागते. 'मी' तिचा चेहरा उचलतो. ती सुखावते. 'मी' ला तिचा मोह होतो.)

[ इतक्यात दारावर थाप ऐकू येते.
दोघं एकमेकांपासून दूर होतात.
पुन्हा थाप. ]

मी : हे कधी तरी व्हायचंच होतं. तू आता लौकर पळ इथून –

[ कुसुमला कपाटाकडं पाठवतो. कुसुम कपाट सरकवून निघून जाते. मी दार उघडतो. दारात काळोजी. तो आत शिरतो. वेड्यासारखा कानाकोपऱ्यात बघू लागतो. ]

मी : आलात तुम्ही काळोजी?.... बसा. योग्य वेळी आलात, नाही तर क्षणापूर्वी माझ्या मनाभोवतालचे सगळे बुरूज धडाधडा कोसळले असते.... बसा. बसा ना. कोको–बिस्किटं घ्या. तुम्हाला हवी तेवढी. वाटल्यास तो डबा घेऊन जा.

[ खिशात बिस्किटं ठेवताना काळोजी खिशातली चिटी काढून खाली फेकतो. जातो. 'मी' चिटी पाहातो. उचलतो. ती वाचावी न वाचावी अशा मनःस्थितीत. ]

मी : (चिटी वाचतो) 'पावसाळा संपला तरी अजून आपल्या मुखाचं सूर्य-दर्शन नाही. व्याकूळ झालेय्.'

[ पेठ्यांच्या खोलीतून गाणं ऐकू येतं....

'प्रेम सेवा शरण....सहज जिंकी मन....' ]

आक्का : (बाहेरून हाक मारतात) मालक –

मी : कोण? आक्का? या ना.

आक्का : अभ्यास चाललाय् वाटतं?

मी : हो....हो ना.

आक्का : छान.

[ आक्का खोली न्याहाळतात. ]

तुमच्या खोलीचं रूप एकदम पालटून टाकलंत की.

मी : हो. आमचा प्रभाकर आहे ना?....तो हौशी आहे. बाजारात जाऊन टेबलावर टाकायला हा रुमाल काय घेऊन आला —

आक्का : हा हातानं विणलेला रुमाल दिसतोय्.

मी : असं?

आक्का : कुसुमताईंनीसुद्धा असाच एक रुमाल विणलाय्! आणि ही फुलंदेखील प्रभाकरनंच आणलेली दिसताहेत. हवं तर कुसुमताईंनादेखील सांगू का तुम्हाला फुलं आणून देत जायला?

मी : नको. त्यांना कशाला त्रास? त्या कशाला माझ्यासाठी फुलं आणून देतील?

आक्का : मला सांगताय? कुसुमताईंनी विणलेला रुमाल इथं हजर असताना, त्यांच्याकडची फुलं इथं दिसत असताना तुम्ही मला साळसूदपणे सांगताय्, त्या कशाला फुलं आणून देतील म्हणून? चारचौघींसारखी इथं भाडेकरू म्हणून राहात नाही मी. मोठ्या मालकांची प्रतिनिधी म्हणून राहातेय् मी या वाड्यात. त्यांना जर इथं काय चाललंय् हे कळलं तर —

मी : का....काय चाललंय्? तुम्ही कशाबद्दल –

आक्का : तुम्हाला चांगलं कळलंय् ते, म्हणूनच गांगरला आहात ना? एकच सांगते, जे चाललंय ते कुणाच्याच हिताचं नाहीय. वडलांनी तुम्हाला अभ्यासासाठी इथं ठेवलंय् तो अभ्यास आधी करा. आणि मग वागायचं तसं खुशाल वागा. तुम्ही सूज्ञ आहात असं समजते मी.

मी : पण आक्का, माझ्या हातून असं काही घडेल असं वाटतं तुम्हाला?

आक्का : मोहाचा क्षण भेटण्याआधी प्रत्येक ऋषीमुनींनी अगदी हाच प्रश्न स्वतःला केला होता मालक!....तुमची इथली गार्डिअन आहे मी. या क्षणापासून सगळ्या गोष्टी बंद व्हायला हव्यात. (एवढ्यात काळ्या येतो.) हा आला माझा घेणेकरी. गेल्या जन्मीचं देणं लागते ना मी त्याचं!.... चल, तुझं ताट वाढून ठेवलंय् कधीचं. चार घास खाऊन घे. (जाऊ

लागतात ) आता सगळं अन्न गरम करावं लागणार.

[ आक्का आणि काळ्या जातात. 'मी' कपाटावर ठेवलेल्या वाग्दत्त वधूचा फोटो उचलतो. त्या फोटोशी बोलू लागतो. ]

मी : तुझी–माझी पत्रानंच भेट होतेय् हल्ली. तुला माझ्या मनाची कल्पना नाहीय. तुला कुसुम माहीत नाहीय, तिच्या चिठ्या माहीत नाहीयत. तुझ्या पत्रांची मी अजूनसुद्धा पहिल्याइतक्याच आतुरतेनं वाट पाहात असतो.... पण कुसुमच्या चिठ्यांचीदेखील मी का वाट पाहात असतो ? तुझी पत्रं वाचताना, मध्येच कुसुमची मूर्ती नजरेसमोर का उभी राहाते ? तिचे स्पर्श मला का आठवायला लागतात ? माझं काही तरी चुकतंय् ....वाटतंय्, हे सगळं जे चाललंय् ना, ते या घटकेलाच तोडून टाकावं.

[ काळोख ]

## दृश्य तिसरे

[ आठएक दिवसांनंतर.
'मी' ची खोली.
'मी' कॉटवर झोपलेला. बाहेर काळ्याचा आरडाओरडा. तो चारचारदा दार वाजवतो. ]

मी : ( उठत ) आधीच अभ्यासाचं जागरण, त्यात ही कटकट.

[ 'मी' दार उघडतो. घाबरलेला काळ्या खुणेनं आपल्याला त्रास दिल्याचं सांगतो. ]

मी : ( दाराबाहेर बघत ) काय रे सद्या, ह्या काळोजीच्या का मागं लागला आहेस ? पुन्हा त्याची कुरापत तर काढ, नाही तुला नंगा करून उलटा टांगला तर बघ ! ( बाहेर दाबक्यांचं हसणं. ) वा ! दाबकेमहाशय, पोराचे प्रताप पाहाताय् वाटतं ? काढील, नाव काढील हो तुमचं.... चला, घेऊन जा त्याला.

दाबके : ( बाहेरून ) चल रे सद्या....

[ काळोजी खिशातली चिठी काढून खाली टाकतो आणि जातो. 'मी' चिठी उचलतो.

यादरम्यान कुसुम दारापुढलं कपाट सरकवून आत येते. 'मी ' च्या हातातली उघडलेली चिठी बघते. स्वतःशीच हसते. चिठीतला मजकूर वाचल्यासारखी बोलते. ]

कुसुम : 'दुपारी घरी राहा, नाही तर रात्री यावं लागेल.' (हसते.)

[ 'मी ' दचकून तिच्याकडं बघतो. ]

मी : तुम्ही कशाला आलात इथं ?

कुसुम : अहो–जाहो काय लावलंय तुम्ही ?

मी : तुमच्याशी एकेरी बोलण्याचं मला काही कारण दिसत नाही.

कुसुम : मग कारणाशिवाय एकेरी बोला. तेच मला आवडतं.

मी : तुम्हाला काय आवडतं आणि काय नाही ह्याचा विचार मी करत नाही.

कुसुम : मी मात्र तुम्हाला काय आवडतं याचा विचार नेहमीच करते. (पदराखालून डबा काढून 'मी ' पुढं धरून उघडते.) आज मी तुमच्यासाठी खरखसाच्या वड्या आणल्या आहेत. तुम्हाला आवडतात त्या.

मी : मला त्या वड्या बिलकूल आवडत नाहीत.

कुसुम : नाहीत ? मग बाकरवड्यासुद्धा बिलकूल आवडत नसणार ?

मी : चूक. मला फक्त बाकरवड्याच आवडतात.

कुसुम : (मोठ्यानं हसते) बघा. बाकरवड्याच आहेत. हं, घ्या एक.

मी : मी खाणार नाही. तुम्ही त्या घेऊन निघून जा बघू इथून. (कुसुम तरीही तोंडाजवळ वडी नेते. 'मी ' तिचा हात झटकतो. वडी खाली पडते.)

[ कुसुम क्षणभर 'मी ' कडं बघते. खाली वडी उचलायला वाकते. ]

कुसुम : आम्ही एवढं तुमच्यासाठी धडपडावं — आणि तुम्ही मात्र तुसडेपणानं —

मी : हे मी मागच करायला हवं होतं.

कुसुम : काही चुकलं माझ्या हातून ?

मी : सगळंच चुकलंय. माझ्यासाठी खायला करणं, इथल्या वस्तू हक्कानं घेऊन जाणं.... इथून आणखी कायकाय घेऊन गेला आहात तुम्ही ?

कुसुम : तुमचा एक ब्लेझरचा निळा कोट.... पण तो रफू करायला नेलाय. परवा पॅंट नेली होती. सायकलमुळं पायाशी फाटली होती. ती शिवून आणून ठेवलीय.... आणि तुमचं 'महाभारता ' चं पुस्तक घेऊन गेलेय्.

मी : कशाला ? रफू करायला की शिवायला ?

कुसुम : काळजाला पडलेली भोकं रफू करायला आणि फाटलेलं आभाळ शिवायला !

मी : तुम्ही एक परस्त्री आहात. तुमचं लग्न झालंय्.

कुसुम : मला नको असलेलं.

मी : आपल्याला पुष्कळ गोष्टी नको असतात. पण तरी त्या आपल्याला मानाव्या लागतात.

कुसुम : ज्या गोष्टी आपण केल्या असतील त्या फार तर आपण मानाव्यात. जे आपण केलं नाही, त्याचा दंड आपल्याला का म्हणून ? हे लग्न माझ्या मनाविरुद्ध माझ्या आईबापांनी केलं. ते मानत नाही मी. हे लग्न नुसतं नावापुरतं आहे. कुठल्याही बाईला ते नाकारावंच लागेल.

मी : कुसुम, तुझ्या दृष्टीनं तुझं वागणं बरोबर असेलसुद्धा, पण माझं वागणं नक्कीच चुकीचं ठरेल. समजा, उद्या माझ्या वडलांना हे कळलं, पेठ्यांना कळलं — त्यांनी माझं असं काय वाईट केलंय् ?

कुसुम : तुम्ही माझा विचारच करत नाही ? तुम्हाला माझ्याबद्दल कधीच थोडीसुद्धा आपुलकी नव्हती ? काही, काही वाटत नव्हतं ?

मी : हे बघा, असल्या प्रश्नाचं उत्तर मी देऊ शकत नाही. आणि असल्या प्रश्नाची उत्तरं द्यायचीही नसतात.

कुसुम : काही वाटत नाही असं म्हणून तुम्ही मला तोडलं नाहीत एवढंसुद्धा खूप झालं मला. ( उठते ) माझ्या मनाचा मला मुळीच विश्वास देता येणार नाही. मन फार मारावं लागलंय. मध्येच ते वेडावून जातं हो.... तुमची अडचण मी जाणते.... त्याला आहे एक मार्ग. हे मधलं दार तुम्ही कायमचं बंद करून टाका. दुर्दैवी माणसानं जास्त हव्यास धरूच नये. दुसऱ्याला त्या दुर्दैवात वाटेकरी करू नये.... हा डबा ठेवू की परत नेऊ ?

मी : ठेवा.... ठेव, कुसुम.

[ कुसुम कपाटात डबा ठेवते. जायला निघते. ]

कुसुम : तुमचा कोट रफू करून झाला की येईल तुमच्याकडं. महाभारताचं पुस्तक थोडे दिवस माझ्याकडं राहिलं तर चालेल ना ? मला धीर द्यायला हवंय् ते. येते मी. ( दाराशी जाते. )

मी : माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नकोस. मला कुणी समजून घेतलं तर तूच घेऊ शकशील, कुसुम.... ( कुसुम मधल्या दारानं जाते. हुंदका ऐकू येतो.... दार बंद होतं. )

[ 'मी' एकदम दाराशी जातो. कपाटावर डोकं टेकून 'कुसुम.... कुसुम' म्हणू लागतो. ]

[ बाहेरून प्रभाकर 'पोस्टमन' असं चेष्टेनं ओरडतो. 'मी' दार उघडतो. प्रभाकर आत येतो. त्याच्या हातात दोन पत्रं आहेत. ]

मी : कुणाची पत्रं आहेत ?

प्रभा : (एका गुलाबी पत्राचा वास घेत) सुगंधी, रंगीत पत्र. हे बहुतेक तुझ्या भावी पत्नीचं असणार....घ्या, पारायणं करा....(दुसरं पत्र पाहून) चिरंजीव राजमान्य राजेश्री....टाकानं लिहिलेला पत्ता – म्हणजे हे तुमच्या तीर्थरूपांचं असणार....तुम्ही ते पत्र वाचेपर्यंत आम्ही हे पत्र वाचतो.

मी : (गुलाबी पत्र घेत) वाचा....नशीब, हे पत्र तरी आम्हाला दिलंत.
(प्रभा हसतो. पाकीट फोडून आतलं पत्र काढतो.)

प्रभा : (वाचू लागतो) चिरंजीव राजमान्य राजेश्री....अं.... अं.... यांना अनेक उत्तम आशीर्वाद विशेष —

मी : (पत्र वाचायला सुरुवात केलेली) हळू रे....(वाचू लागतो.)
[ मुलीच्या आवाजात पत्रातील मजकूर ऐकू येऊ लागतो.) मुलीचा आवाज : आमच्या विद्यापीठानं बहुतेक परीक्षांच्या तारखा पंधरा दिवस अलीकडंच ओढल्या आहेत. मी खूष आहे. परीक्षेच्या कटकटीतून चांगले दोन आठवडे अगोदर सुटका होणार....दोन आठवडे तुमच्या सहवासात जास्त मिळणार म्हणून इतका आनंद झाला आहे. परीक्षा झाल्याबरोबर लग्न करायचं असं आमचे आप्पा म्हणताहेत.... ]

प्रभा : (पत्र मोठ्यानं वाचतो) तीर्थरूप म्हणताहेत, पेठे यांच्याकडून भाड्याचा एक फदाही मिळालेला नाही. उलट त्यांच्या घराच्या दुरुस्ती-पोटी मला दोनशे सतरा रुपये भुर्दंड पडला आहे. आपण जातीनं तिथं असता व मी वारंवार स्मरण दिलं असता –

मी : (एक मिनिट रे ! असा आविर्भाव करून वाचू लागतो.)

मुलीचा आवाज : स्मरणातच नाहीय की काय ? की तिथं कुणी तुम्हाला मोहिनी घातली आहे ? या पत्राचं उत्तर वेळेवर आलं नाही तर बघा. मी तडक तुमच्याकडं निघून येईन आणि तुमचं उत्तर तोंडीत घेईन. कृपा करून –

प्रभा : (मोठ्यानं वाचतो) पेठ्यावर आपली एवढी कृपादृष्टी का ? त्यांचे पैसे आपण अद्याप वसूल का केले नाहीत ?....आपणाविषयी काही निनावी पत्रं मजकडं येऊन पडली आहेत, एवढंच तूर्तास लिहितो.... मित्रवर्य, मामला फार गंभीर दिसतोय्. ('मी' दचकून गुलाबी पत्र बंद करतो.) तर एकूण हे असं आहे !

मी : काय ? असं काय आहे ?

प्रभा : मर्डर विल् वी आउट. हत्येला वाचा फुटणारच.

[ दारात पेठे येतात. संतापलेले. ]

पेठे : (आत शिरताशिरता) यूआ से, थिङ्ग्ज् मस्ट स्टॉप् ॲट वन्स ! मी

तुम्हाला वॉर्न करतोय् मालक.

मी : (गांगरलेला) मिस्टर पेठे –

पेठे : आय् वोन्ट लिसन्....धिस् मस्ट स्टॉप् ॲट वन्स. दॅट्स ऑल. धिस् ईज सीरिअस....व्हेरी सीरिअस.

प्रभा : तुम्ही पेठेसाहेब, काय बोलायचं आहे ते माझ्याशी बोला.

पेठे : नो ! मी संबंधित माणसाशीच बोलणार आहे आणि तो संबंधित माणूस या क्षणी हाच आहे !

मी : पेठेसाहेब, तुमच्या ह्या रागावण्याचा अर्थ –

पेठे : अर्थ ? अनर्थ आहे. आहात कुठं ? (प्रभाकरला) मी रागावलोय् ? संतापानं लाहीलाही होतेय माझ्या अंगाची. आय् टेल् यू, ईफ् धिस् कंटिन्यूज् –

मी : अजून तुम्ही काय म्हणताय ते कळत नाहीय मला. तुला काही कळतंय प्रभाकर ?

पेठे : वकील आहे मी मालक. पुराव्याशिवाय बोलत नसतो मी. मला काही चिठ्ठ्या मिळाल्या आहेत.

मी : (दचकून) चि....चिठ्ठ्या ?

पेठे : येस....ॲंड द कल्प्रिट मस्ट बी पनिश्ड. ह्याचा तावडतोब बंदोबस्त तुम्ही करणार आहात की नाही ते सांगा.

प्रभा : ('मी' ला) ही चिठ्ठ्यांची भानगड –

पेठे : (मूठ उघडत) बघा ह्या चिठ्ठ्या. रास्कल, बदमाष....व्हिलन्.... ह्या असल्या चिठ्ठ्या पाठवतो तो गद्धा. (आता 'मी' सुटकेचा श्वास टाकतो....) जिराफ....रेडा....

मी : पाणघोडा –

पेठे : एका तोंडाची दोन तोंडं होतील तेव्हा कळेल....गाढव ! आणि सरकारी कागदावर चिठ्ठ्या लिहितो असल्या ? सरकारी कागद मारायचे आणि आरमार तयार करायचं....आपल्या वाड्यात सरकारी चाकरी करणारा हा एकटाच बैल आहे....आय कॅन प्रूव्ह इट इन् द कोर्ट ऑफ लॉ....बघा.... हातात घेऊन बघा. (हातातल्या चिठ्ठ्या 'मी' पुढं धरतात.)

मी : पण ह्या गटारात भिजलेल्या आहेत —

पेठे : सो व्हॉट ? मी नाही हातात धरल्या ?....ह्या गुंडगिरीचा बंदोबस्त करण्याचं तुमचं कर्तव्य आहे. या चिठ्ठ्यात तुमचीसुद्धा खोडी काढलीय त्यानं. अहो आमच्या होम डिपार्टमेंटला इतका त्रास होतोय ह्या गटारपत्रांचा ! त्यांची आर्डर आहे, याचा बंदोबस्त तुम्हीच केला पाहिजे.

वाटल्यास तुम्ही तुमच्या वडलांना कळवा.

मी : पेठेसाहेब, एक महत्त्वाचं बोलायचंय. आजच वडलांचं पत्र आलंय. तुम्ही तावडतोब आजपर्यंतचं सगळं भाडं चुकतं केलं पाहिजे. रुपये एकशे-पाच.

पेठे : करेक्ट! अँड सी द फॅन्. लोकांकडून मला बारापंधराशे रुपये येणं आहे आणि मी एकशेपाच रुपये भरू शकत नाहीय....देण्याचं कुणी नावच काढत नाही आजकाल. देणेकरी देत नाहीत आणि घेणेकरी सोडत नाहीत....

मी : मला जास्त काही ऐकायचं नाहीय. मला लगेच एकशेपाच रुपये हवे आहेत. ते द्या, प्रश्न मिटला.

प्रभा : मी स्वतःच ह्याच्या वडलांचं पत्र वाचलं. ते तुमच्यावर भयंकर संतापले आहेत.

पेठे : संतापणारच !....कुणीही संतापेल. काय हो ? पण खरं सांगायचं तर माझी परिस्थिती....खोटं वाटत असेल तर आमच्या होम डिपार्टमेंटला विचारा....मी त्यांना आणू का बोलावून इथं ? ('मी' पुन्हा मधल्या दाराकडं बघतो. कुसुम तिथं ऐकत असावी या अंदाजानं.)

मी : नको....त्याची काहीएक जरुरी नाहीय. अहो, पण तुमच्याकडं जेवणं चालतात –

पेठे : पण जेवणाचा आणि भाड्याच्या थकबाकीचा काही संबंध नाही. जेवण हे प्रेमापोटी, होम डिपार्टमेंटच्या.

मी : मी वडलांना काय कळवू तेवढं सांगा.

पेठे : कळवा....कळवा.... पैशाचं लक्षात आहे, लौकरात लौकर मी चुकते करतो.

मी : मला वायदे नकोत. नक्की तारीख आणि दिवस सांगा.

पेठे : ओ. के. फिफ्टीन डेज्. तुमची सगळी बाकी एकदम चुकती केली तर चालेल ना ?....मात्र होम डिपार्टमेंटला तुम्ही काही बोलू नका....त्यांना हे फार इन्सल्टिंग वाटेल.

मी : (मुद्दाम मधल्या दाराकडं बघत) असं ! मग त्यांना सांगाच, मालकांनी पंधरा दिवसात सगळं भाडं द्यायला बजावलंय....मला चहा-जेवण देण्यापेक्षा राहिलेलं भाडं द्या. तेच गोड लागेल म्हणावं ?

[मधल्या दारामागून अस्पष्ट हुंदका]

पेठे : बरं....त्या हरामखोराचं तेवढं पाहा लगेच. मी आताच दाबक्यांना बोलावून घेतो. (दारात दाबके येतात.)

दाबके : बोलावताय कशाला? मी स्वतःच आलोय इथं.

[ पेठे पटकन् पळून जातात.

दाबके हक्कानं एका खुर्चीवर बसतात. सिगारेट पेटवतात. ]

मी : तुम्ही चोरून ऐकत होता वाटतं आमचं बोलणं?

दाबके : चोरून कशाला? राजरोस जिन्यात उभा होतो मी. आलं ऐकू ते ऐकलं....आपला काळोजी कुठं दिसत नाहीय इथं? तो म्हणजे हल्ली –

मी : मिस्टर दाबके, त्याआधी ह्या सरकारी कागदांकडं बघा. गटारात भिजलेल्या ह्या होड्या आहेत.

दाबके : (हसतात) सांगितलं ना? आमच्या पोराचं काम असणार. आपण मोठ्यांनी पोरांकडं काय लक्ष द्यायचं?

प्रभा : तुमची पोरं प्रेमपत्रं लिहिण्याइतकी वडील आहेत?

दाबके : पोरांचं काय घेऊन बसलात? आजकाल काळोजीसारखा वेडासुद्धा प्रेमपत्र पाठवत असतो! (हसतात.) मी आलोय दुसऱ्याच कामासाठी.... आमच्या घरातसुद्धा जरा दुरुस्ती करून दिलीत तर हवी आहे. आपल्याला वेळ असेल तर –

मी : मला आता वेळ नाही.

दाबके : ठीक आहे. मग उद्या दुपारी येतो मी.

मी : मला उद्यासुद्धा वेळ नाही.

दाबके : असं? मग मी आताच सांगतो. दुपारी घरी राहा, नाही तर रात्री यावं लागलं.

[ दाबके हसू लागतात. 'मी' सुन्न होतो. ]

[ अंक दुसरा समाप्त ]

# अंक तिसरा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ७९७०९ नों. दि. २९/७/८३
वि. ……… क्र. ………

## दृश्य पहिले

[ पेठ्यांची खोली. सरती दुपार. आक्का आणि कुसुम बोलत बसलेल्या. कुसुम आक्कांच्या साडीला शिवण घालत आहे. ]

आक्का : मी म्हणते कुसुमताई, तुम्हा आता एकाद्या उत्तम डॉक्टरला का तब्येत दाखवून येत नाही ? ( कुसुम टाके घालण्यात मुद्दाम गर्क होते ) म्युनिसिपालिटीच्या डॉक्टरकडं जाऊन आलात तरी दर चारआठ दिवसांनी तुम्हाला हे होतंच आहे. कुठं बाहेर गेलात, पडलात रस्त्यात, तर कोण निस्तरणार आहे ?

कुसुम : अं हं ? नाही, कुणीच नाही निस्तरणार.

आक्का : म्हणून म्हणते, चांगल्या डॉक्टरकडं जा....मी घेऊन जाऊ का तुम्हाला डॉक्टरकडं ?

कुसुम : डॉक्टर काय फुकट तपासणार आहे ? जावं तिथं पैसा मोजायला हवा तो कुठून आणू ?

आक्का : मी तुम्हाला काही मदत केली तर ?

कुसुम : अं हं ! ( दातांनी टाका तोडते ) घ्या. बघा कुठं शिवण दिसतेय का ती ?

आक्का : ( साडी बघून ) कुठं शिकलात हो हे सगळं ?

कुसुम : शिकले कुणाकुणाकडं. आयुष्यभर वेळ जाता जाणार नाही हे कळलं तेव्हा झक्कत शिकावंच लागलं.

आक्का : कुठं म्हणून शिवण दिसत नाहीय. ( कुसुम कसनुसं हसते ) काय हो !

कुसुम : हेपण मग शिकता येतं आक्का, एकेक शिकताशिकता. दु:खसुद्धा असं शिवावं, कुठं, कसं शिवलंय ते दिसूच नये.

आक्का : समजा कुसुमताई, मी तुम्हाला शिवणाचे म्हणून पैसे दिले तर

घ्याल का ? मग चांगल्या डॉक्टरकडं तरी तुम्हाला जाता येईल.

कुसुम : ( खिन्नपणे हसते. ) पैसे आले की आधी मालकांना मोजले पाहिजेत. त्यांचा सारखा तगादा चालू आहे. आधी लगीन त्यांच्या देण्याचं.

आक्का : कळलं का तुम्हाला ? मालकांचं लग्न ठरलंय. आता परीक्षा देऊन इथून गेले की वैशाखात लग्न.

कुसुम : अं ? हो. चांगला सुखाचा संसार करतील दोघं. घर मुलांबाळांनी भरून जाईल.

आक्का : दिसायला देखणी आहे मुलगी.

कुसुम : मी पाहिलाय फोटो. ( दचकते ) म्हणजे आमच्याकडं चहाला आले होते तेव्हा सांगत होते लग्न ठरल्याचं. खिशात तिचा फोटोही होता.... आक्का, तुमचं अस्मानी रंगाचं पातळदेखील द्या एकदा रफू करायला.

आक्का : देईन. गुलाबाची कलमं काय म्हणताहेत तुमची ?

कुसुम : अं ? आहेत ना. आहेत बिचारी. फुलं फुलताहेत, गळून पडताहेत.... म्हणजे देवावर तर किती वाहाणार हो ? बाकीची आताशा जातात बिचारी गळून....वेळ हल्ली खायलाच येतो मला. आक्का, मला किनई, माझी स्वतः-चीच भीती वाटायला लागलीय. म्हणून मी पेटी शिकायला जायचं ठरवतेय. येताना रस्त्यात तो क्लास आहे ना पंडित पितळ्यांचा ? तिथं जाणार आहे. पितळ्यांची बहीण माझ्या ओळखीची आहे. मला फुकट शिकता येईल.

आक्का : पण पंडित पितळ्यांबद्दल मी जे ऐकलंय.....

[ इतक्यात बाहेरून पेठे येतात. आक्का उठतात. ]

पेठे : बसा हो. बसा. ( कुसुमला ) आक्कांना चहा–पोहे काही –

आक्का : चहा झालाय माझा. ( कुसुम आतल्या दाराशी जाते )

पेठे : मग आता पोहे खाऊन जा. ( कुसुमला ) पोहे करा चांगले दोनचार बश्या. आम्हालाही भूक लागलीय.

आक्का : नको. मी जाते. ( जातात )

[ पेठे आत जाणाऱ्या कुसुमकडं बघतात. हसतात. ती आत जाऊ लागते. ]

पेठे : अहो होम डिपार्टमेंट–( कुसुम थबकते ) आम्हाला काही शिरा, पोहे ?– पोटात कावळ्यांची शाळा भरलीय. ( पुढं होतात. )

कुसुम : ( आत जाऊ लागते ) आपण तिथून बोललात तरी ऐकू येईल मला आत !

पेठे : हां, मालकांना बोलावू का ? झकास पोहे करा मालकांसाठी !

कुसुम : संबंध काय त्यांचा ? खाण्यापेक्षा त्यांना भाडं हवंय आधी. तुम्ही पंधरा दिवसांची मुदत दिलीत त्यालाच दोनअडीच महिने झाले. बघावं तेव्हा

खाण्यापिण्याच्या गोष्टी. ह्या अशा गोष्टीपोटीच लोकांची देणी थकतात. सगळ्यांची मान सदा खाली राहाते.

[ दार वाजतं. दारात 'मी' उभा. कुसुम आणि पेठे आश्चर्यचकित. 'मी' कुसुमकडं बघून किंचित हसतो. ती हसते. सुखावते. ]

पेठे : वा! वा! मालक– अगदी वेळेवर आलात. आम्ही एवढ्यातच तुमची आठवण काढली होती. ( कुसुमकडं बघतात. ती होकारार्थी त्यांच्याकडं मग 'मी' कडं बघते. )

मी : असं?

कुसुम : चहा घ्याल ना?

मी : अं? बरं, घेईन. अर्धा कपच हं. लौकर मिळाला तर.

कुसुम : अगदी लौकर आणते. ( आत जाते )

पेठे : ( लाचारीनं हसत ) आज म्हणजे कमालच केलीत की. तुम्ही आपण-होऊन आलात काय, चहा घेतो म्हणालात काय....आपल्याला हे असं आवडतं बघा. माणसानं कसं घरच्यासारखं, आपलंच समजून वागावं.

मी : पेठेसाहेब, मी घराच्या भाड्याबद्दल बोलायला आलोय. चहा घ्यायला नाही. मिसेस पेठ्यांच्या अपरोक्ष मला तुमच्याशी बोलायचंय म्हणूनच मी चहाच्या निमित्तानं त्यांना आत पाठवलंय. ( पेठे नर्व्हस. खुर्ची उचलून 'बसा' अशी खूण करतात. ) तुम्ही पंधरा दिवसांचा वायदा केलात, त्याला आता दोन महिने उलटून गेले.

पेठे : हो.

मी : एकशेपाचाची बाकी एकशेपस्तिसावर गेलीय.

पेठे : जाणारच. आपण थांबलो तरी दिवस जात राहातात. बाकी वाढत जाते. आता माझ्या देणेकऱ्यांचीच उदाहरणं बघा ना.

मी : मला ते काहीएक ऐकायचं नाही. तुम्ही भाडेकरू आहात एवढंच मी जाणतो. माझी परीक्षा डोक्यावर आलीय.

पेठे : हो. हा डिसेंबर. म्हणजे – ( बोटांनी मोजत ) जानेवारी, फेब्रुवारी, मार्च. साधारण मार्च एंडलाच परीक्षा येतात लॉच्या.

मी : माझं आधी बोलणं होऊ दे. पैशासाठी तुम्ही मला असे खेटे घालायला लावता हे शोभत नाही तुम्हाला. आज सत्तावीस तारीख आहे. या एकतीस तारखेपर्यंत वाटेल ते करून भाडं चुकतं झालं पाहिजे. दॅट्स ऑल!

पेठे : मला नकोय का ते चुकतं व्हायला? पण काय आहे मालकसाहेब, आमच्या होम डिपार्टमेंटची प्रकृती, दोन महिने झाले, बरी नाहीय.

मी : त्यांच्या प्रकृतीशी मला कर्तव्य आहे?

पेठे : नाही....नाही. म्हणजे त्याचं काय झालं – भाड्याच्या पैशाची मी अगदी चोख व्यवस्था केली होती. ह्या एक जानेवारीला नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच तुम्हाला चहाफराळाला बोलावून तुमच्या हाती सगळी बाकी सुपूर्द करणार होतो. पण होम डिपार्टमेंटच्या प्रकृतीपायी खर्च वाढत गेला.

मी : तुम्ही कारणं चांगली शोधून काढता एकेक.

पेठे : नो. नो. मालकसाहेब, इट्स अ फॅक्ट. खरं सांगू ? त्यांच्या प्रकृतीची मला फार काळजी वाटतेय हल्ली. तुम्हाला कल्पना नाही, मनानं अतिशय हळव्या आहेत त्या. त्यात मानसिक आणि शारीरिक ताण. वाटतं, त्यांच्यासाठी खूप काही करावं, पण मनी ईज द ओन्ली प्रॉब्लेम.

मी : तोच पैशाचा प्रॉब्लेम माझ्या वडिलांनाही पडलाय. त्यांची दर चार दिवसाला पत्रं येताहेत. ( पेठे मघाच्याच काळजीत. ते आत बघतात ) मी काय सांगतोय ते ऐकताय ना ?

पेठे : ( आपल्याच मूडमध्ये ) ह्या सगळ्या ताणांमुळं त्या सारख्या चिडचिडलेल्या, संतापलेल्या असतात. संताप आवरेनासा झाला की, एकदम फीट येऊन पडतात....त्यांना अशी फीट आली की –

मी : फीट ? कशामुळं ?

पेठे : फीमेल कंप्लेंट्स ! म्युनिसिपालिटीच्या डॉक्टरना एकदा दाखवलं होतं. ते म्हणतात, हिस्टेरिया आहे. हल्ली त्यांची खाण्यापिण्यावर वासना नाही. चार-चार दिवस तशाच उपाशी राहातात.

मी : पेठेसाहेब, हे सगळं खरं असलं तरी माझा प्रश्न आहे फक्त भाड्याशी. तुम्ही वाटेल ते करून चार दिवसात सगळी बाकी देऊन टाका.

पेठे : मी पंधरा जानेवारीपर्यंत होईल तेवढी व्यवस्था करतो.

मी : होईल तेवढी नाही. सगळी व्यवस्था केली पाहिजे. नाही तर मला तुमचं सगळं सामान रस्त्यावर काढावं लागेल.

पेठे : मी....मी पाय धरतो तुमचे मालक. होम डिपार्टमेंटची प्रकृती अशी नाजूक झालीय....रस्त्यावर काढलंत तर आमचे हाल....( पाय धरू लागतात )

[ दरम्यान कुसुम दारात आलेली. ती संतापानं थरथरू लागते. ]

कुसुम : ( पेठ्यांना ) आता माझ्या प्रकृतीचं कारण सांगून पाय धरताय त्यांचे ? तुम्ही....तुम्ही आणलीय ही वेळ माझ्यावर....बोलू नका. तुम्हाला माहीत आहे ते. तुम्ही....तुम्ही कारणीभूत आहात सगळ्याला. त्यांना कशाला सांगताय माझ्या प्रकृतीबद्दल ? त्यांना फक्त भाडं हवंय. फक्त पैसे हवे आहेत. ( 'मी' बोलायला बघतो ) आता तुम्ही तरी खोटं बोलू नका.

आतून ऐकलंय मी सारं. आहेत कुठं भावना तुम्हाला ? ( पेठ्यांना ) मी.... मी मेले तरी चालेल, त्यांना त्यांचं भाडं देऊन टाका. हे....हे रस्त्यावर सुद्धा फेकतील आपल्याला. ( 'मी' ला ) मला कळायला हवं होतं, तुम्ही आपणहोऊन माझ्याकडं कधीच येणार नाहीत. आपणहोऊन चहा कधीच मागणार नाहीत. तुम्ही आलात फक्त भाड्यासाठी. फक्त पैशासाठीच ना ? ( थरथरू लागते ) तुम्ही जा. निघून जा इथून. भाडं मिळेल तुम्हाला. भाडं दिल्याशिवाय मरतासुद्धा येणार नाहीय मला....जा म्हणतेय ना ?

[ हाताच्या मुठी वळू लागते. ]

पेठे : मालक, आय ॲम सॉरी. तुम्ही जा. प्लीज.

[ 'मी' निघून जातो. ]

कुसुम : गेल्या जन्मी काय पाप केलं होतं म्हणून हा दुबळा संसार माझ्या नशीबी आलाय....

[ कुसुम खाली पडणार, इतक्यात पेठे तिला धरतात. ]

पेठे : होम डिपार्टमेंट....अहो होम डिपार्टमेंट –

[ कुसुम फीट येऊन खाली पडते – काळोख ]

## दृश्य दुसरे

[ 'मी' ची खोली. 'मी' अभ्यास करत बसला आहे. आजूबाजूला पुस्तकं पडलेली. दारावर थाप. 'मी' दाराकडं बघतो. पुन्हा अभ्यास चालू करतो. क्षणभरानं दारावर थाप. ]

मी : ( कुरकुरत ) काय काळोजी, तुम्हाला म्हटलं होतं, आमची परीक्षा जवळ आलीय. ( जाऊन दार उघडतो. दारात दाबके. त्यांच्या कपाळावर पट्टी लावलेली ) माझा अभ्यास चाललाय.

दाबके : अरे हो, परीक्षा जवळ आलीय, नाही का ? अहो, आत तर येऊ द्याल दोन मिनिटं ?

मी : दोन म्हणजे दोनच मिनिटं.

[ दाबके खुर्चीवर बसतात. सिगारेट पेटवतात. ]

मी : मला वाटतं, दोन मिनिटं झाली.

दाबके : होऊ द्यात हो.

मी : तुमचं काय काम असेल ते सांगा आणि चालायला लागा इथून.

दाबके : आज संक्रांत. म्हटलं, मालकांना तिळगूळ देऊन यावं....

मी : कपाळाला ही पट्टी कसली ?

दाबके : ( दचकून ) नाही, परवा जरा रात्री डोक्याला ते आपलं हे लागलं.... आपल्या दिंडीदरवाजाचं दार हो....वाकून येताना कधीकधी लागतंच ते.... ( उठून कपाटाजवळ जात ) एक बाकी कमाल वाटते हं. नेमक्या चौदा जानेवारीलाच संक्रांत येते. इतकी वर्षं पाहातोय ना मी. चौदा जानेवारी म्हणजे चौदा जानेवारी.... वायदा म्हणजे वायदा. खरंच, आमच्या शेजाऱ्यांनी, म्हणजे वकीलसाहेबांनी भाडं आणून दिलं का सगळं ?

मी : त्याच्याशी तुम्हाला काही कर्तव्य ?

दाबके : आहे, म्हणून तर चौकशी. हिचा भाचा इथं नागपूरला बदली होऊन येतोय. चांगला अडीचतीनशे रुपये पगार आहे. भाडं एक तारखेला म्हणजे एक तारखेला देईल. म्हणालात तर दोनपाच रुपये जास्तसुद्धा देईल पेठ्यांपेक्षा.

मी : सध्या वाड्यात जागा खाली नाहीय. होईल तेव्हा बघू.

दाबके : होण्याचा काही संभव ? म्हणजे समजा, मोठे मालक पेठ्यांना नोटीस देणार असले —

मी : सध्या जागा नाहीय. माझा अभ्यास राहिलाय —

दाबके : ( खिशातून तिळगूळ काढत ) असो. तर.... ( तिळगूळ देत ) तिळगूळ घ्या आणि गोड बोला....आमच्याशीसुद्धा. ( 'मी' तिळगूळ टेबलावर ठेवून देतो ) खाऊन टाका लगेच.

मी : राहू दे. मग घेईन.

दाबके : हल्ली पेटीवादन ऐकताय की नाही ?

मी : पेटीवादन ?

दाबके : तर ? मिसेस पेंठे सध्या पंडित पितळ्यांच्या गायनक्लासला जाताहेत.

मी : तुम्हाला दाबके, दुसरा उद्योग नाहीय का ?

दाबके : नाही. मुलांचे अभ्यास चालले आहेत.... तुमचाही अभ्यास चाललाय. पेटीच्या आवाजानं तुमचं अभ्यासात मन तरी लागेल का ? तर तेवढं बघा, आमच्या कानावर पेटीचा आवाज पडला, आम्ही तो तुमच्या कानावर घातला, संपलं.

मी : ठीक आहे. मला त्रास झाला की पाहीन मी.

दाबके : ह्या पंडित पितळेमहाराजांचं नाव पेटीवादन शिकवण्यापेक्षा दुसऱ्या कर्मात (नाकपुडीवर बोट) फार ऐकू येतं नागपुरात. तुम्हाला माहीत असणारच म्हणा. असं आहे, वाड्यातल्या वाड्यात गुपित राहाणं वेगळं आणि बाहेर बभ्रा होणं वेगळं, नाही का?

मी : तुम्ही निघा आता.

दाबके : असं म्हणता? ठीक आहे.

[ दाबके जातात. 'मी' दार लावतो. 'मी' पुन्हा अभ्यासाला लागतो. काही क्षणातच दारापुढलं समोरचं कपाट दूर होतं. कुसुम येते. तिनं काळी चंद्रकळा नेसलेली. अंगावर चार दागिने. ]

मी : तुम्ही?

कुसुम : क्षमा करा. आत येण्यापूर्वी परवानगी घ्यायला विसरले मी. पण आज संक्रांत आहे, म्हणून आलेय तिळगूळ द्यायला. घेणार ना? ('मी' विचारात) नाही म्हणालात तर माझ्यापेक्षा मी केलेल्या ह्या हलव्याला जास्त दुःख होईल. आधीच बिचाऱ्याच्या अंगावर नाजूक काटा आलाय –

मी : (हात पुढं करत) द्या.

[ कुसुम कनवटीला लावलेली कापडाची छोटी पिशवी काढते. ]

कुसुम : तिळगूळ घ्या. ('मी'च्या पाया पडते. 'मी' क्षणभर तिला स्पर्श करून उठवण्याच्या बेतात. पुन्हा संयम राखतो.)

कुसुम : येते मी. अभ्यास चालू दे तुमचा. परीक्षेत चांगले पास व्हा.... लग्न करा.... सुखात राहा. (जाऊ लागते. 'मी' क्षणभर विचार करून अभ्यासाला लागतो. वळून बघत नाही. कुसुम हळूच वळते. हातातल्या बांगड्या काढून टेबलावर ठेवते. आवाज होतो. 'मी' उठतो.)

मी : हे काय?

कुसुम : घराचं भाडं.

मी : मी....मला तुझ्याकडून भाडं नकोय.

कुसुम : का? मी काय तुमच्या घरात राहात नाही?

मी : तरीसुद्धा या रीतीनं मी भाडं स्वीकारणार नाही.

कुसुम : पण मला ते द्यायचं आहे. मी भल्या घरची बाई आहे. उगाच पैशासाठी मी पदरी कमीपणा नाही घेणार.

मी : तुला कुणी कमीपणा दिला? मी तुझ्याकडं कधी भाडं मागितलं होतं?

कुसुम : न मागतादेखील कमीपणा येतोच की.

मी : पेठ्यांची कड घेऊन तू बोलते आहेस कुसुम.

कुसुम : तुमच्या तत्त्वाप्रमाणंच आहे ते ! तसे ते निरुपद्रवी, भावडे आहेत. त्यांनी कधी मला छळलेलं नाही. माझ्यासाठी त्यांचा जीव तुटत असतो. त्यांची कड घेण्याइतकी तरी देणं लागतेच मी त्यांची. पैसा कमावता येत नाही हा काय त्यांचा अपराध आहे ?

मी : नाही....नाही. मी भाड्याचा तगादा लावला हा माझा अपराध आहे. पण त्याबद्दल ही शिक्षा तू देऊ नकोस मला. तुझे दागिने तू घेऊन जा.

कुसुम : मी हे दागिने माझे समजत नाही. तुमचेच आहेत ते.

मी : मग माझे दागिने मी तुला घेऊन जायला सांगतो.

कुसुम : भल्या घरची बाई वाटेल त्याच्याकडून दागिने घेत नाही.

मी : मी काय वाटेल तो आहे, कुसुम ?

[ कुसुम 'मी' कडं तीक्ष्ण नजरेनं बघते. 'मी' ओशाळतो. ]

कुसुम : माझ्या माहेरचे दागिने आहेत हे. अडचणीच्या वेळी ते उपयोगी पडताहेत.

मी : ते दागिने तू घेऊन जा. माझं ऐकणार नाहीस ?

कुसुम : आजवर तुमचं खूप ऐकलं. तुम्ही सांगितलंत, या खोलीत पाय ठेवू नकोस, मी माझ्या पायातली अधीरता तोडली.

मी : कुसुम, हे आता शेवटचं ऐक. ( तिच्याजवळ जातो. तिचा हात धरतो.) माझ्यासाठी हे दागिने घाल आणि जा.

कुसुम : मला सोडा. प्लीज. ( 'मी' तिच्या हातात बांगडी चढवतो. ती निसटून जाण्याचा प्रयत्न करते. तिचा झोक जातो. ती पलंगावर पडते. ) नको. खरंच पाया पडते मी. ( 'मी' तिच्या बोटात आंगठी घालतो. ) आंगठी घालायचा अधिकार कुणाला असतो, माहीत आहे ? तुमचं लग्न ठरलंय. तुम्ही दुसऱ्या कुणा मुलीचे होणार आहात. आता मला छळू नका. माझ्या अंगाला हात लावू नका. ( कुसुम हाताच्या मुठी वळते. डोळे फिरवते. कुसुम पडणार इतक्यात तिला 'मी' सावरतो. 'कुसुम, कुसुम' म्हणू लागतो. एवढ्यात दारावर थाप येते. एकदा, दोनदा. 'मी' गोंधळतो. )

प्रभा : ( बाहेरून ) मिस्टर, काय चाललंय ? दार उघडा की लौकर. ( 'मी' गांगरतो. दरम्यान दाराच्या कडीचा आवाज चालूच. 'मी' मग पुढं जाऊन दार उघडतो. प्रभाकर आत येतो. 'मी' दार बंद करतो. प्रभाकरची कुसुमकडं नजर वळते. )

प्रभा : हा काय प्रकार आहे ?

मी : अरे, ह्या बेशुद्ध पडल्या आहेत. आत्ता एवढ्यातच. मी मग सगळं काही सांगतो तुला. तू पटकन् बाहेर जाऊन कांदा, अमोनिया काही तरी आण. जा.

[ प्रभाकर विचार करत दाराशी जातो. ]

मी : कुसुम, कुसुम, तू जागी झालीस का ? जागी हो लौकर, कुसुम.

[ 'मी' गोंधळतो. आणखी गोंधळतो. क्षणभरात जिन्यावर पावलांचा आवाज. पेठ्यांच्या–दाबक्यांच्या बोलण्याचा आवाज. ]

पेठे : (बाहेरून) मालकसाहेब, आज चोर मुद्देमालासह पकडलाय ! (दाबक्यांना) या, असे या, अंग कशाला चोरताय ?

दाबके : अंग कोण चोरतंय ? हा येतोय की.

पेठे : मालक, दार उघडा दार. आता बंदोबस्त झालाच पाहिजे या पाजी-पणाचा.

दाबके : मीही तेच म्हणतोय – मालक, दार उघडताय ना ?

पेठे : आहात ना घरात ?

दाबके : दार आतून बंद आहे म्हणजे असणारच ते. पण कदाचित् ते तुम्हाला भेटायला उत्सुक नसतील या क्षणी.

पेठे : मालकसाहेब –

[ यादरम्यान खोलीत 'मी' अत्यंत अस्वस्थ ]

प्रभा : कोण उगाच ओरडतंय ?

मी : आमची परीक्षा जवळ आलीय. आमचा अभ्यास चाललाय.

प्रभा : दार उघडणार नाही आम्ही. तुम्ही जा पाहू ?

मी : वाटल्यास मग या सावकाशीनं.

दाबके : मग नाही, आत्ता लगेच दार उघडा.

[ 'मी' दचकतो. कुसुमकडं बघतो. इतक्यात काळ्याचे वेडेवाकडे चीत्कार ऐकू येतात. जिन्यावर धावपळीचा आवाज. ]

दाबके : (बाहेरून घाबऱ्या सुरात) अरे .... अरे .... जा, खाली जा .... (काळ्याचं हसणं) अरे, या वेड्याच्या हातात ही सुरी कुणी दिलीय ? डोळे पाहा त्याचे. अरे.... अरे .... अरे .... ए सदाशिव, आधी काठी आण. पळा....पळा....(जिन्यावर धाडधाड आवाज)

प्रभा : लेका, इतके दिवस खोदूनखोदून विचारत होतो, तेव्हा मारे तू —

मी : अं हं.... ती बेशुद्ध झाली आणि इथं पडली एवढंच.

प्रभा : पण मग ती स्वतःच्या घरात का नाही बेशुद्ध पडली ?

मी : ती थकलेलं भाडं द्यायला इथं आली होती.

[ कुसुम किंचित् शुद्धीवर येते. ]

मी : शुद्धीवर आलीस ना कुसुम ? आता मात्र तुला इथून चटकन् जायला हवं. ( कुसुम उठते ) जाशील ना तू नीट ?

कुसुम : जाईन.

[ 'मी' कुसुमला हात देऊ बघतो. ती तो स्वीकारत नाही. ती जिन्याकडं वळते. ]

मी : जपून कुसुम —

[ कुसुम जाते. 'मी' कपाट सरकवतो. एवढ्यात जिन्यावरून कुसुम पडल्याचा आवाज ऐकू येतो. तिची किंकाळी ऐकू येते. ]

मी : प्रभाकर, मला वाटतं, कुसुम जिन्यातून पडलीय. तिला कदाचित् वरंच लागलं असेल.

प्रभा : मग तुला जावंसं वाटत असेल तिला पाहायला. जा. फजिती पुरी झालीशी वाटत नसेल तर जरूर जा. तिच्या जिवाची काळजी वाटणारच तुला.

मी : हो. कारण ती माणूस नक्कीच आहे. मित्रा ! माणसाचे मोह, माणसाची तहानभूक तिलाही चुकलेली नाहीय !

प्रभा : तुला मी आता माझ्या घरी नेऊन ठेवणार आहे परीक्षा संपेपर्यंत. तुमचं इथलं अवतारकार्य समाप्त झालं आहे मिस्टर. आता यापुढं इथं वाड्यात राहून तुमचा अभ्यास होईलसं वाटत नाही मला.

मी : माझ्यापुढं आता एकच प्रश्न उभा आहे, तो वडलांकडं पेठ्यांचं भाडं पाठवण्याचा.

प्रभा : ते भाडं तुम्ही भरा. घड्याळ, आंगठी काहीही विकून. इथं वाड्यात मात्र राहू नका. एव्हापर्यंत तुम्ही न केलेल्या कृत्यांच्या नौबती गावभर झडत असतील.

[ दाबके, त्यांच्यामागून आक्का वर येतात. ]

दाबके : मालक, पेठेबाई आक्कांच्या जिन्यात कोसळल्या आहेत. कपाळाला ही एवढी खोक पडलीय. मी विचारतोय आक्का, त्यांना तुमच्या जिन्यात जायचं कारणच काय ?

आक्का : माझा गुढघा दुखत होता म्हणून मी कुसुमताईंना म्हटलं, जरा माझी घागर तेवढी जिन्यावरून काढून द्या. जिन्यात त्यांचा पाय घसरला आणि शेवटच्या पायरीवर डोकं आपटून त्यांना खोक पडली — दाबके, चार दिवसांपूर्वी तुम्ही मधल्या भिंतीवर चढून पेठ्यांच्या घरात रात्री शिरायला बघत होता तेव्हा खाली पडून तुमच्या नाही का डोक्याला लागलं ? तसंच

कुसुमताईंच्या लागलं हो....तुमच्या सदाशिवनंच सांगितलंय हे आम्हाला. आणि तुमच्या कपाळावर ही पट्टी दिसतेय की धडधडीत! (दाबके नर्व्हस)

प्रभा : ('मी' ला) चल आपण पाहून येऊ त्यांना. आक्का, तुम्ही तरी त्यांना कशाला जिन्यावर पाठवायचं ?

आक्का : मालक, मला वाटतं, डॉक्टरना बोलवावं. कुसुमताईंना अजून शुद्ध आलेली नाहीय. पेठे आणि यांचा सदाशिव आहेतच त्यांच्याजवळ.

[ खालून पेठ्यांचा आवाज : " आक्का, लौकर या. " ]

[ सगळे खाली जायला वळतात. दाबके हसत उभे — काळोख ]

## दृश्य तिसरे

[ पूर्वीच्या दृश्यानंतर तीनएक महिन्यांनी. वाड्याचा दर्शनी भाग. पेठ्यांच्या खोलीतून कुसुमच्या पेटीचे सूर ऐकू येत आहेत. " भूल कशी पडली जीवा. " दाबके खोलीतून इकडंतिकडं पाहात येतात....पेठ्यांच्या खोलीशी थांबतात. आत बघतात. मग आत जाण्याचाही विचार करू लागतात. आक्का हातात वाटी घेऊन येतात. ]

आक्का : दाबके – ( दाबके भयानक दचकतात ) कुसुमताईंना बघायला जात असाल तर जाताना हे एवढं चाटण घेऊन जा त्यांना द्यायला. माझी तरी खेप वाचेल, तेवढीच गुडघ्याला विश्रांती मिळेल.

दाबके : नाही.... म्हणजे मी जात होतो म्हणजे.... आपण काही त्यांच्या घरात जात नाही, जाणार नाही.

आक्का : हो, होडीनं जाता येत असेल तर कोण कशाला चालत जाणार मुद्दाम ? नाही का ? पुन्हा जे बोलायला शरम वाटते ते पत्रात लिहून पाठवता येतं.

दाबके : आक्का, तुमचं वय पाहून मी बोलत नाही इतकंच.

आक्का : गटाराला शोभेल असा मजकूर आणि मजकुराला शोभेल असं

तुमचं अक्षर !

दाबके : तुम्ही दुसऱ्या चिठ्या वाचल्या नाहीयत म्हणून....आपल्या काळ्याच्या खिशात मिळतात त्या. म्हणजे पूर्वी मिळायच्या. आता चिठ्ठी घेणारा इथं नाही आणि काळ्याही नाही. त्या दिवशी पेठे आणि मी दोघांचा जीव मात्र घेतला असता त्यानं. कुणी गाढवानं त्याच्या हातात सुरी दिली होती ?

आक्का : तुमच्या दिवट्या चिरंजीवांनी. सदाशिवनं. आणि त्यानंच मग त्याला वाड्यातून हाकलण्यासाठी मरेपर्यंत मारलं. मला विचारा ना सगळं.

[ पेठे येतात. खूप आनंदात. ]

पेठे : आक्का, खास बातमी आहे. आत्ता रस्त्यात मालकांचे स्नेही भेटले होते. आपले प्रभाकरपंत हो. परीक्षा संपली म्हणे मालकांची. आता एवढ्यात इथं येतील ते.

दाबके : तर आपले आदर्श मालकमहाशय इथं अडीचतीन महिन्यांनंतर अवतीर्ण होताहेत ! काळ्याही बरा होऊन पुन्हा इथं मुक्कामाला येईल. म्हणजे पोस्ट खात्याची सेवा वाढणार. आणि परीक्षा झालीय म्हणजे अभ्यासही नाही – राहातील मौजमजा करत शहरात. ( दरम्यान कुसुम दारात येऊन उभी राहिलेली. )

आक्का : परीक्षा झालीय, आता ते कशाला राहातील इथं ? दरसालप्रमाणं लगेच सामान आवरून वडलांकडं जातील.

दाबके : यंदाची गोष्ट वेगळी आहे आक्का.

आक्का : जा आता. पेठेसाहेब आले आहेत. ते प्रकृतीकडं बघतील कुसुम-ताईच्या.

[ दाबके चिडून जातात. ]

आक्का : कुसुमताई, एवढं हे चाटण करून आणलंय तुमच्यासाठी, ते घ्या.

पेठे : आणि लौकर आधण ठेवा चहाचं. एवढ्यात मालक येताहेत परीक्षा संपवून. गावी परत जाण्यापूर्वी त्यांना चांगलं पंचपक्वान्नाचं जेवण घातलं पाहिजे. नो.... नो.... त्यांचं सगळं भाडं चुकतं झालंय. या महिन्यापर्यंतचं. त्या आनंदाप्रीत्यर्थ ही पंचपक्वान्नी मेजवानी. चला. ( कुसुमच्या अंगाला हात लावणार एवढ्यात ती अंग चोरते. पेठे आक्कांकडं बघून हसतात. )

[ आक्का आपल्या खोलीकडं वळतात. कुसुम आत जायला वळते, इतक्यात ‘ मी ’ येतो.....कुसुम थबकते.... दोघांची नजरानजर....]

पेठे : यावं – यावं. परीक्षा संपली ना ?

मी : हो. दुपारीच.

आक्का : पेपर कसे ? चांगले गेले ना ? ('मी' होकार देतो) जाणारच.

पेठे : आता पास झाल्यावर अंगावर काळा कोट चढवून तुम्ही फुलफ्लेज्ड ॲडव्होकेट होणार.

कुसुम : आक्का, चहा टाकू का तुम्हाला सगळ्यांना ?

पेठे : जरूर ! काय मालक ?

मी : (कुसुमकडं बघतो. कुसुम निर्विकार) मी खोलीवर जाऊन हातपाय धुऊन मग घेईन चहा. चालेल ?

[ ती निर्विकारच ]

पेठे : चालेल. काय हो ? (तरी ती निर्विकार)

आक्का : केव्हा गावाला पळताय ? जरा दोन दिवस विश्रांती घ्या –

मी : छे हो. रात्रीच्या गाडीनंच निघतोय. वडलांची तार आलीय, परीक्षा संपताच लगेच इकडं निघून ये म्हणून. लग्न आहे ना आता मे महिन्यात !

पेठे : अरे वा ! काँग्रॅच्युलेशन्स. व्हेरी गुड न्यूज्. (कुसुमला) काय हो ?

कुसुम : (मुद्दाम बोलते) हो ना. चांगलीच बातमी आहे.

मी : पत्रिका येईलच....सगळयांनी यायचं लग्नाला.... आक्का, सगळ्यांन आणण्याची जबाबदारी तुमची.

पेठे : मग मालक, आज रात्री आमच्याकडंच या ना जेवायला....(कुसुमला) काय हो ? केळवणच करून टाकू.

कुसुम : घाईत नको. लग्नानंतर आले की दोघांना एकदम बोलवावं.

पेठे : गुड सजेशन्. ('मी' जिन्याकडं जाऊ लागतो, तेवढ्यात) अरे हो, तुमचे आभार मानायचे राहिले. ते आता मानतो. आक्कांच्या देखत आणि होम डिपार्टमेंटच्या समक्ष.

आक्का :<br>
मी : } कशाबद्दल ?

पेठे : सांगतो. (कोटाच्या खिशातून कागद काढत) याबद्दल....पाहा. पाहा. आपल्या वडलांकडून आलेली ही भाडेपावती. रुपये एकशेऐंशी मात्र रोख मिळाले. जे पैसे आम्ही भरलेच नाहीत ते मिळाल्याची लेखी पावती. स्टॅंप लावून. इन ब्लॅक ॲंड व्हाइट ! हे कसं झालं असेल हे काय कळत नाही आम्हाला ? ही सारी तुमची कृपा. तुमच्या कृपेची ही पावती आहे. तुमच्या प्रेमाची ही पावती आहे. तुम्ही आम्हाला साफ लाजवलं आहे. काय होम डिपार्टमेंट ? (कुसुम ताडकन् आत जाते) आजकाल अशी माणसं विरळा....फार फार विरळा. आमच्या होम डिपार्टमेंटनं तुम्हाला आजच जेवा म्हटलं असतं, पण सध्या त्यांची हेल्थ.... (डोळे टिपत आत

जातात. )

मी : आक्का, इच्छा होती. मिसेस पेठ्यांशी बोलावं, त्यांची विचारपूस करावी....

आक्का : राहू दे. मला माहीत आहे सगळं.

मी : आक्का, तुम्ही आम्हाला दोघांनाही बजावलं होतं.

आक्का : खोटं होतं ते मालक. साफ खोटं होतं....कुसुमताईंच्या ठिकाणी दुसरी कुणी स्त्री असती तर तिनं हेच केलं असतं अशा परिस्थितीत. ( 'मी' चकित ) मालक, पुष्कळ गोष्टी आपल्याला कराव्याशा वाटतात, पण जगाला भिऊन आपण त्या करत नाही. करत राहातो फक्त खंत, पश्चात्ताप, आणि मग ती खंत, तो पश्चात्ताप विसरायला आपण साळसूदपणे दुसऱ्याला उपदेश करायला लागतो – असं करू नकोस, असं करणं बरं नाही....तसाच खोटा उपदेश करत होते मी कुसुमताईंना. आणि तरी त्या तुम्हाला भेटत होत्या. तुमच्यावर जीव लावत होत्या.... मालक, खरंखुरं प्रामाणिक प्रेमच असल्या खोट्या उपदेशांची कुंपणं मानत नाही....जाऊ दे. आता झालंगेलं विसरून जा. चांगला संसार करा.

मी : तरी चारपाच महिने मला इकडं येता येणार नाही....तुम्ही पेठ्यांच्या घराकडं बघाल ना? काही लागलं तर कळवा मला. अधूनमधून पत्रं पाठवून हकीकत कळवत जा इथली, म्हणजे काळजी वाटणार नाही. प्रभाकरलाही मी बोललो आहे.

आक्का : मालक, कुणासाठी काही करता येत नसेल तर त्याची काळजीसुद्धा करू नये. कुणी कुणाची काळजी करावी त्याच्यादेखील गाठी बांधलेल्या असतात देवाघरी.

[ 'मी' काहीही न बोलता जिन्यानं वर जाऊ लागतो. पेठ्यांच्या घरातून फोनोवर गाणं ऐकू येऊ लागतं. 'बद जाउ कुणाला शरण....' – काळोख ]

## दृश्य चवथे

[ पूर्वीच्या दृश्यानंतर चार महिन्यांनी. वाड्याचा दर्शनी भाग. दिंडीजवळ काळ्या हेल काढून रडतोय. दाबके दार उघडून बाहेर डोकावतात. ]

दाबके : काय शिंची कटकट आहे ही! ए गाढवा, कुणी मरतंयबिरतंय की काय इथं? कुत्र्यासारखा रडतोय? (कुसुम बाहेर येते हे पाहून लगेच मागं पळतात. दार लावून घेतात.)

[ कुसुम बाहेर येते. तिच्या हातात चुरमुरे असलेली वाटी. ती पुढं जाऊन काळ्याला चुरमुरे देते. तिच्या चालण्यावरून तिला दिवस गेल्याचं ध्यानी यावं. ]

कुसुम : घे....माझ्या वाटणीचे चुरमुरे तुझ्या मुखी तरी जाऊ देत. (काळ्या ते घेत नाही) घे रे. आम्ही नाही का हेच खाऊन आज पोट भरतोय? घे माझ्या सोन्या. (काळ्या चुरमुरे घेतो.) आणि आता रडू नकोस हं हेल काढून. आतडं तुटतं बघ माझं. थांब, तुला पाणी आणून देते. (कुसुम आत जाते. पाणी घेऊन बाहेर येते. एवढ्यात आक्का बाहेर येतात.)

आक्का : मी देते कुसुमताई. या अवस्थेत तुम्ही जरा धावपळ कमी करा. खाण्याची आबाळ आहे, निदान विश्रांती तरी घ्यावी म्हणते मी.

[ आक्का कुसुमच्या हातातलं भांडं घेऊन काळ्याला देतात. काळ्या पाणी पितो. पुन्हा हेल काढतो. ]

आक्का : (काळ्याला) आता तुझं रडणं पुरे. गप. (काळ्या गप्प होतो.) कुसुमताई, वकीलसाहेब घरातच आहेत ना?

कुसुम : बाहेर गेले आहेत मला वाटतं.

आक्का : आं? या परिस्थितीत त्यांना तुम्ही बाहेर कशाला सोडलंत? की तेच गेले आपणहोऊन? ऊन नुसतं रणरणतंय बाहेर. त्यांचं डोकं बिघडलंय. ऊन लागणं चांगलं नाही इतकं. जाऊन आले का ते हॉस्पिटलमध्ये तपासणी करून?.... बोला की काही —

कुसुम : एकादे वेळी तिकडंच गेले असतील.

आक्का : अशा वेळी बरोबर कुणी माणूस हवं. हे शेजारी आहेत नुसते भिंतीला कान लावायला नाही तर भिंतीवरून चढायला.

कुसुम : कशाला आक्का कुणाला नावं ठेवताय?

आक्का : ठेवताय म्हणजे? मला काय भीती आहे कुणाची? (हाक मारतात) दावके – अहो दावके —

कुसुम : राहू द्या हो.

दावके : (आतून) काय?

आक्का : दार उघडून या की जरा बाहेर! कुणी खात नाहीय तुम्हाला इथं.- (दावके बाहेर येतात. कुसुम तिरस्कारानं आपल्या खोलीत जाते.) दावके, पेठ्यांना घेऊन हॉस्पिटलात जरा गेला असता तर काय पाय झिजले असते तुमचे?

दावके : आक्का, खरं तर त्यांना आता वेड्यांच्याच इस्पितळात ठेवायला हवंय. चागलं वर्ष दोन वर्ष. मी मोठ्या मालकांना तसं पत्र टाकलंच आहे पंधरवड्यापूर्वी. भाड्याच्या नावानं पुन्हा शंख. तेव्हा धाकट्या मालकांनी- पैसे भरले. प्रेमापोटी. आता कोण प्रेम करणार? झालं, त्यांचं लग्न झालं – नवी विटी, नवं राज्य. ह्या वेड्याला हाकलून मोठ्या मालकांनी माझ्या- बायकोच्या भाच्याला ही जागा दिली असती तर —

आक्का : दावके, तुम्हाला काय काळीजबिळीज आहे की नाही?

दावके : मोठ्या मालकांनी तरी दुसरं काय केलंय हो? त्यांचं उत्तर आलंय मला. त्यांनी पेठ्यांच्या वडिलांना जवलपूरला पत्र पाठवून जागा खाली करायला सांगितलंय त्यांना.

आक्का : धाकट्या मालकांना यातलं काही –

दावके : असणारच कळलेलं. आता काय? गरज सरो, वैद्य मरो. मोठ्या मालकांच्या पत्रात आहे, धाकटे मालक चारसहा दिवसातच नागपुरी येऊन पेठे यांच्या जागेसंबंधी योग्य ती पुढील कारवाई करतील. (पेठ्यांच्या घराकडं बघत) मिसेस पेठ्यांचं पेटीवादन सुधारलंय, नाही? शिकवणारे ते पंडित पितळे नुसतं पेटीवादन शिकवूनच थांबत नाहीत म्हणे. चांगली शिष्या लाभली तर.... म्हणजे जागा झालीच की नाही संशय घ्यायला?

[बाहेरून पेठ्यांचा आवाज येतो. ते वेडंवाकडं गात आहेत.

संशय का मनि आला —

आक्का, दावके बाहेर बघतात. कुसुम दारात येऊन उभी राहाते. पेठे वाड्यात येतात. त्यांनी उलटा शर्ट घातला आहे. टाय डोक्याला गुंडाळलेला. आत येताच ते दिंडीजवळ काळ्याशी हस्तांदोलन करतात.]

पेठे : गुड मॉर्निंग माय डिअर फ्रेंड. (गातात) संशय का मनि आला.... काळ्या, संशय का मनि.... मनी ईज द मेन प्रॉब्लेम डिअर फ्रेंड....(पुन्हा

गाऊ लागतात. कुसुम घाबरून आत जाते.) अहो होम डिपार्टमेंट, या, या, अशा बाहेर या दरबारात. तुमचा मुखचंद्रमा दाखवा. (गाऊ लागतात)

चंद्रमा विहार करी। मोद देतसे चित्ता....

(दाबके हसतात) चित्त्यासारखी झेप घेईन एडक्या. तुला पकडीन! (जाऊन दाबक्यांना धरतात) यू रास्कल! यू ब्रूट! यू सन ऑफ अ बीच!

दाबके : पेठे, आधी शर्ट सोडा माझा. (कुसुम आणि आक्क बाहेर येतात. आक्का कुसुमला जवळ घेतात.)

पेठे : (शर्ट न सोडता) संशय का मनि आला....म्हण माझ्याबरोबर....हं.... म्हणतोस की देऊ एक थोतरीत ठेवून? (दाबके घाबरून म्हणू लागतात.) स्टॉप.

दाबके : सोडा.... सोडा मला.

पेठे : पाया पडलास?

दाबके : पडतो. (पाया पडतात.)

पेठे : कुत्ते की अवलाद.... (दाबके पळून जातात) नाउ द नेक्स्ट आयटेम. होम डिपार्टमेंट, अशा बाहेर या, या राजाचे पाय धरा. (ओरडून) येताय की मी तिकडं येऊ पाय घेऊन?

आक्का : पेठे, हे काय चाललंय?

पेठे : अजून तुमची मिजास उतरली नाही? सेनापती, तयार राहा. (पुढं जातात. आक्कांना ढकलून कुसुमचा हात धरतात) सापडला! पोटात लपून बसलेला शत्रू तावडीत सापडला! आता त्याला जिवे मारायचा. (कुसुमला आत नेऊ लागतात.)

कुसुम : आक्का.... आक्का, वाचवा मला.

पेठे : कुणी मध्ये पडेल त्याची मुंडी छाटली जाईल. जबान काटली जाईल. शत्रूला लाथाबुक्क्यांनी मी मारणार! पोटात लपून बसलाय्!

[कुसुमला फरफटत आत ओढून नेतात. दार बंद करतात. आक्का दारावर धक्के देतात.]

आक्का : (दाबक्यांच्या दाराशी जात) दाबके.... अहो जरा बाहेर या. (दाबके बाहेर येतात.) ते दार फोडून आत जाऊ या. पोरीला मारून टाकील हा वेडा.

दाबके : दार कशाला फोडताय? आमच्या घरातून मी मधल्या भिंतीवरून सहज त्यांच्या खोलीत जातो. (आत जातात.)

[पेठ्यांच्या खोलीतून पेठ्यांचा आवाज : " अँड नाउ, बी रेडी....किक्

नंबर वन्..." कुसुमची किंकाळी : "आक्का—" पेठ्यांचा आवाज : "किक् नंबर टू...." कुसुमची किंकाळी.... पेठ्यांचा आवाज : "किक् नंबर थ्री." कुसुमची जीवघेणी किंकाळी : "आक्का, वाचवा...." – काळोख ]

## दृश्य पाचवे

[ वाड्याचा दर्शनी भाग.
पूर्वीच्या दृश्यानंतर दोनएक महिन्यांनी. वाड्यात तशी सामसूम. दाबक्यांच्या खोलीचं दार बंद. पेठ्यांच्या खोलीसमोर एक बेरकी दिसणारा तरुण अस्वस्थ होऊन फेऱ्या मारताना दिसतो. मध्येच तो घड्याळात बघतो. दिंडीदरवाजाजवळ टांगेवाला थांबलेला. ]

टांगेवाला : साहेब, मला लेट होऊन राहिलाय बघा.

तरुण : आणि मला काय लेट होऊन राहिला नाहीय? तुम्ही नागपूरचे टांगेवाले म्हणजे —

टांगेवाला : पर सामान तर सारं भरलंय कधीचं.

तरुण : सारं कुठलं? आत अजून फोनो आहे, वाज्याची पेटी आहे. ती मलाच हातात घेतली पाहिजे.

टांगेवाला : एवढ्यात महाराज, एकदोन सवाऱ्या भेटून गेल्या असत्या —

तरुण : एवढ्यात मलासुद्धा मालक चार वेळा भेटून गेले असते. (आक्कांना हाक मारतो) तेलंगबाई – अहो तेलंगबाई —
[ आक्का दाराशी येतात. ]
मालकांच्या गाडीला ॲक्सिडेंट झालेला दिसतोय बहुतेक. अजून आले नाहीत.

आक्का : आल्यापासून असं सारखं अभद्र काय बोलताय? येतील एवढ्यात मालक.

टांगेवाला : मानसानं कसं? नेहमी भल्याची गोष्ट बोलावी!

तरुण : बरं बरं.... नाही तर आक्का, तुमच्याजवळ निरोप देऊन ठेवतो.

आक्का : नको. ज्याचा निरोप त्यालाच द्या.

तरुण : सामान केव्हाच टांग्यात ठेवलंय — आत फोनो आहे आणि पेटी आहे, ती मी स्वतःच टांग्यात नेऊन ठेवणार आहे.

आक्का : त्या दोन्ही वस्तू माझ्या आहेत.

तरुण : तुमच्या आहेत ? असतील तर ठेवा. इथं कुणाला ओझ्याची हौस आलीय ?

[ 'मी' आत येतो. हातात प्रवासी बॅग. 'मी' गावाहून आलेला. काळ्या उठून पुढं येतो. ]

मी : बरे आहात काळोजीमहाराज ! मग खोलीवर येऊन जा माझ्या. तुमच्यासाठी मी शर्ट–पँट आणलीय. नवी, कोरी करकरीत. आमच्या लग्नाची भेट बरं का !

[ काळ्या नुसता बघतो. ]

मी : आक्का —

तरुण : एक मिनिट. आपणच या वाड्याचे मालक ना ?

मी : हो.

तरुण : नमस्कार. म्हटलं येताय की नाही ! थांबलोय मी केव्हाचा. हा टांगेवालादेखील —

मी : आपण कोण ?

आक्का : आपल्या पेठेवकिलांचे भाऊ.

तरुण : हो. सख्खा आणि अर्थातच धाकटा....मी दादाला गावी नेण्यासाठी आलोय. आलोय म्हणजे काल रात्रीच आलोय. घरातलं सगळं सामान आवरलं – तुम्हाला फक्त सांगायला थांबलोय. खोली खाली करून आम्ही जातोय म्हणून. ( टांगेवाल्याला ) तू जाऊन बस टांग्यात. आता पाच मिनिटातच येतो आम्ही. ( टांगेवाला जातो ) तुमचे हे नागपूरचे टांगेवाले महा माजोरी ! ह्यांच्या ह्याच्यावर चाबकाचे चांगले फटके दिले पाहिजेत !

मी : तुम्ही खोलीबद्दल बोलताय.

तरुण : हो. तर खोली रिकामी केलीय. आत चिंधीसुद्धा राहिलेली नाहीय. हां, वहिनी तेवढ्या आहेत. पण त्यासुद्धा संध्याकाळी चालत्या होतील बहुतेक इथून. आता तशा त्या तेलंगबाईकडंच आहेत.

मी : त्या तुमच्याबरोबर येणार नाहीयत ?

तरुण : छ्या !

मी : त्या येणार नाहीयत की तुम्ही त्यांना नेणार नाही आहात ?

तरुण : अं ? दोन्ही.... हो. त्याही येणार नाहीत आणि आम्हीही त्यांना नेणार नाही.

आक्का : अहो, पण असा विचार करा —

तरुण : वन् मिनिट आक्का. हं, तर वहिनींचं येणं आमच्या दादासाहेबांच्या प्रकृतीचा एकूण विचार करता उचित नाही....मग घेऊ तुमची रजा, मालक ?

मी : थांबा.

तरुण : वहिनींबद्दल काही बोलायचं असेल तुम्हाला.

मी : नाही ! भाड्याबद्दल बोलायचंय. पाच महिन्यांचं भाडं तुमच्याकडून येणं आहे.

तरुण : पंधरा पाची पंचाहत्तर....असू दे. सांगतो वहिनींना. त्या देतील तुमचं भाडं. माझ्याजवळ आता तेवढे पैसे नाहीयत....आणि देऊ दे की वहिनींना. त्यांना न्यायला आलं कुणी त्यांच्या माहेरचं तर देतील ते. नाही तरी लग्नात कुठं एवढा मोठा हुंडा मोजला होता त्यांनी ?.... तर हे ठरलं. (हाक मारतो) वहिनी, मालकांना पाऊणशे रुपये द्यायचे आहेत भाड्याचे, तेवढे तुम्ही द्यायचे. विसरू नका. हो, समोरासमोर रुजवात केलेली बरी. काय ?

आक्का : मी काय म्हणत होते ? कुसुमताई कुठून देणार पैसे ? ('मी' ला) अहो, त्यांच्या माहेरच्या चार वस्तूदेखील यांनी ठेवल्या नाहीत. घराचा कानाकोपरा धुऊन टाकलाय. मी वापरायला दिलेला फोनोसुद्धा —

तरुण : तो झालाय ना परत ? आणि आक्का, हा प्रश्न खासगी आहे. हो, आणि तसं कायद्यानं म्हणाल, तर वहिनींचे एकूण एक देव आम्ही ठेवले आहेत त्यांच्यासाठी.

आक्का : मालक, तुम्ही यांना काही सांगाल तर —

तरुण : ते वकिली पास झालेत आक्का. संबंध नसेल तिथं बोलणार नाहीत ते. काय ? बरं, निघतो. गाडीची वेळ झालीय. टांगेवाला कोकलून राहिलाय आणि दादासाहेबांचा भ्याड गोळा घेऊन जायचाय.

['मी' चकित.]

आक्का : पेठे ठार वेडे झालेत.

तरुण : त्यांना गावी नेऊन मेंटलमध्ये टाकलं की सुटलो आम्ही !

[बोलतबोलत खोलीत जातो.]

तरुण : (खोलीत) उठा आता....मालकांची भेट झालीय. निघू या आता.

[तरुण आतून पेठ्यांना घेऊन बाहेर येतो. पेठे पूर्ण वेडे झालेले.]

मी : वकीलसाहेब ! (पेठ्यांना काहीही कळत नाही. तरुण त्यांना घेऊन जातो. पेठे गेल्यावर आक्कांच्या खोलीतून कुसुम बाहेर येते. आपल्या

खोलीत जाते. )

आक्का : मी सारखी पत्रं पाठवत होते. दोनएक महिने जरी आधी आला असतात —

मी : वडलांची प्रकृती बिघडली. प्रॅक्टिस कुठं करायची ते ठरत नव्हतं.

आक्का : एकटेच आलात ?

मी : हो. ही येईल महिन्याभरात....तुम्ही लग्नाला नाही आलात आक्का ?

आक्का : कशी येणार ? इथं केवढा गोंधळ झाला होता !

मी : प्रभाकर लग्नाला आला होता. त्यानं कल्पना दिली होती मला थोडीशी.

आक्का : मेले सगळे आधी तुमचाच संशय घेत होते. मी काढली मग एकेकाची खरवड. मी स्वतः पेठ्यांच्या खोलीतून दाबक्यांना बाहेर येताना पाहिलं होतं. अगदी मध्यरात्री. त्यांच्या मधल्या भिंतीवरून तिच्या घरात शिरला असेल तो. बिचारीला फीट आलेली असेल, त्या वेळी घेतला असेल राक्षसानं गैरफायदा. मेला टपलेलाच होता ना तिच्यावर !

मी : हं – ( सुस्कारा ) तिचं एखाद्या चांगल्या माणसाशी लग्न झालं असतं तर तिनं फार प्रामाणिकपणानं आणि निष्ठेनं संसार केला असता.

आक्का : त्याला सुखी केलं असतं, स्वतः सुखी झाली असती, पण दैवानं पोरीवर नुसता वर्षावच केला पाहा आपत्तींचा. पोरीचं हे असं व्हायला नको होतं. त्या दिवशी पेठ्यांनी लाथाबुक्क्या घालून तिला मोकळी केली. एका परीनं सुटली म्हणायची. गळ्यात पोर पडतं तर ? सडी होऊन जातेय ते बरंच म्हणायचं. आपण तरी काय करणार ? कशाच्या बळावर तिला थांबवणार आपण ?

मी : तिच्या माहेरचं कुणी येणार आहे ?

आक्का : आहे कोण असं माहेरचं ? एक लहान भाऊ आहे म्हणे आठनऊ वर्षांचा. तो कुठं आत्याकडं का कुठं असतो अन्नावारी राबत.

मी : मग पेठ्यांचा भाऊ म्हणत होता ते ?

आक्का : त्या काळतोंड्याचं काय ऐकता ! एवढ्यातच मी विचारलं कुसुमताईंना. त्या म्हणे कुणाचीच वाट बघणार नाहीयत आता. संध्याकाळच्या गाडीनं जातील त्या. ( 'मी' कावराबावरा. ) जायच्या आधी भेटणार आहेत तुम्हाला. आपल्या माणसाचा निरोप घेतल्याशिवाय जायच्या नाहीत त्या. ( आत जातात. )

[ कुसुम खोलीतून बाहेर येते. हातात पिशवी आणि कागदात गुंडाळलेलं

एक बोचकं. ]

क्षणभर दोघांची नजरानजर....खूप काही आठवणारी, सांगणारी.

मी : तुझीच वाट बघत होतो कुसुम. जाताना निदान अखेरची भेट व्हावी, अखेरचं बोलणं व्हावं....

कुसुम : जाताना त्याच आठवणीची शिदोरी बांधून घ्यावी.

[ स्तब्धता. ]

मी तुमचे पैसे देणं लागते. मागलं तुम्ही भरलेलं भाडं आणि हे आत्ताचं पाच महिन्यांचं. पण माझ्यापाशी आता काहीच नाहीय हो.

मी : पण कुसुम.... मी.... मला तुझ्याकडून काहीच नकोय.

कुसुम : (हात पुढं करून दाखवत) माझ्यापाशी एवढंच आहे. पण हे बिल्वर तुम्ही घेणार नाहीत. पूर्वी एकदा मी हे तुम्हाला देऊ केले होते. सारं सारंच देऊ केलं होतं, नाही ? आठवतं ?

मी : आठवतंय. सारं सारं आठवतंय कुसुम. जे जे घडलं होतं ते ते आठवण्यासाठीच नव्हतं का ? तुझ्या भेटी, ती फुलं, माझ्या आवडीचे तू केलेले पदार्थ....तो फांझ गंध. कुसुम, तू माझे जोडेसुद्धा पुसून ठेवायचीस ग.

कुसुम : अं हं. काही, काही बोलू नका. तुमच्या शब्दांनी त्या आठवणी पुन्हा जाग्या करू नका. मी....मी हे बिल्वर आताही देऊ करीन, पण तुम्ही तो अपमान मानाल. पण एका फार चांगल्या माणसाचं ऋण घेऊन मी जातेय हेसुद्धा काही थोडं नाहीय.

मी : नाही कुसुम, मी चांगला नाहीय.

कुसुम : आहात की नाहीत हे माझ्याइतकं दुसरं कुणी जाणतं का ? त्या चांगुलपणाची फेड करण्याचं सामर्थ्य मला दिलंच नाहीय बघा परमेश्वरानं... माझ्यामुळं तुमचं काही झालंच असेल तर वाईट झालं. तुम्हाला अकारण बोल लागला. अकारण तुमच्या मनाला क्लेश झाले.

मी : अकारण कशानं ? कुसुम, मलादेखील तुझ्याबद्दल —

कुसुम : अं हं ! आता तरी असं काही बोलायचं नाही. तुम्हाला बोलायचं आहे ते मी ओळखलं आहे. कुठं तरी तापल्या मनावर त्याची फुंकरही पोचली आहे. (हातातलं पुडकं देत) तुमची एक लहानशी सेवा करायचं भाग्य मी तेव्हा चोरून घेतलं होतं....सेवा गोड करून घ्यायची ही. ('मी' पुडकं उघडतो. 'मी' चा ब्लेझरचा निळा कोट त्यात असतो.) किती तरी दिवस हा पडून होता माझ्याकडं....तुमच्या गोष्टी सांगत मला आधार देत.... तुम्हाला न विचारता मी नेला होता. त्या चुकीबद्दल क्षमा करा. फाटला

होता ना, म्हणून रफू करायला नेला होता मी....

[ आवंढा. ]

[ बाहेर पावसाची चिन्हं....ढगांचा गडगडाट. ]

तेव्हा वाटायचं, तुमच्या अंगावर असं फाटकंबिटकं कधी असूच नये.... बघा, कुठं शोधून तरी दिसतोय रफू केलेला ?

[ मी बघतो. ]

मी : कुसुम !

कुसुम : पडवीत माझ्या गुलाबाच्या कुंड्या आहेत. मी दिसले नाही तर त्या सुकतील, विचारत राहातील —

मी : त्या कुंड्या, कुसुम, मी माझ्या खोलीत नेऊन ठेवीन. त्यांची काळजी घेईन. त्यांनी विचारलं तुझ्याबद्दल तर सांगेन —

(बोलता येत नाही, मग) काय सांगू मी ?

कुसुम : मला तरी कुठं माहीत आहे ते सांगायला ?

[ स्तब्धता. ]

तुमचं महाभारताचं पुस्तक माझ्याजवळ आहे. ते मी हक्कानं ठेवून घेणार आहे. चालेल ?

मी : ते मी ठेवण्यासाठीच नव्हतं का दिलं तुला ?

कुसुम : वेळ झालीय गाडीची. ( ढगांचा गडगडाट ) मी निरोप घेते. (वाकते.) आता आशीर्वाद द्यायचा मला.

मी : (मागं सरकत) नाही....एवढा माझा अधिकार नाही.

कुसुम : आहे की नाही तेसुद्धा माझ्याइतकं दुसरं कुणी जाणतं का ? (पाया पडते) आशीर्वाद देताय ना ?

मी : काय आशीर्वाद देऊ तुला कुसुम ?

कुसुम : काहीच देऊ नका. फक्त एकदा डोक्यावर तुमचा पवित्र हात ठेवा.

[ 'मी' तिच्या डोक्यावर हात ठेवतो. ती उठते. 'मी' चे डोळे भरलेले पाहाते. ]

कुसुम : अं हं ! तुम्ही नाही डोळे ओले करायचे. पुसा बघू ते ? माझ्यासाठी असं सुखाच्या सोबतीचं आयुष्य घेऊन जन्माला आला आहात. डोळ्यात अश्रू म्हणून कधी येऊ देऊ नका. ते सारे मला दान करून टाका. माझ्या उरल्या आयुष्यात आता त्यांचीच नाही का सोबत लागणार मला ?

[ कुसुम दिंडीदरवाजाकडं जाऊ लागते.

तिथं थांबते. हुंदका आवरते. ]

मी : कुसुम, तू कुठं जाणार आहेस ? पाऊस बघ कोसळायला लागलाय् —
(ती न बोलताच निघून जाते....ढगांचा गडगडाट वाढतो. ' मी ' एकदम धावत दिंडीशी जातो. ) कुसुम, जपून जा.
[ एवढ्यात विजेचा लोळ प्रकाशतो. कडकडाट होतो. – काळोख ]

— —

निवेदक : मी भरलेलं आभाळ पाहातो, मेघांची गर्जना ऐकतो, तेव्हा कुसुम, आज दीड तपानंतरसुद्धा मला तुझी आठवण येते....दीड तपापूर्वी तुला निरोप दिला, त्यानंतर पुन्हा तुला कधी मी पाहिलं नाही. तुझ्याबद्दल कधी ऐकलं नाही....तेव्हा कधी तरी बातमी ऐकली, एका वेड्याच्या इस्पितळात पेंढ्यांचा अंत झाल्याची. नाममात्र सधवा होतीस ती नाममात्र विधवा झालीस. एवढंच ऐकलेलं....पण तुझं विस्मरण मला कधी झालेलं नाहीय. अजूनही वाटतं, एकाद्या पावसाळी दिवसात अकस्मात् आपली भेट होईल. तुझी उरलेली अज्ञात कहाणी तूच मला सांगशील....पावसाळ्यात सुरू झालेल्या या कहाणीचा शेवट कधी तरी पावसाळ्यातच मी ऐकणार आहे....आणि तो शेवट, कुसुम, मी तुझ्या तोंडूनच ऐकणार आहे.

— समाप्त —

IRBK-0119701

IRBK-0119701

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 98009 नों. दि. 26/7/63
वि. नाटक क्र. ........